
म. ग्रं. सं. ठाणे
विषय कृषीशास्त्र
सं. क्र. २५२
१९५९

REFBK-0010522

REFBK-0010522



विज्ञान प्रकाशन
पुणें-२



# ८० दिवसांत जगाची चक्कर

जूल्स व्हर्न

PHADNIS

# ऐशीं दिवसांत जगाची चक्कर

लेखक : ज्यूल्स व्हर्न


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम २८५५३ वि: प्र. प्रवास

क्रमांक २८२ नों॰ दि॰ ८/१२/६०


संक्षिप्त रूपांतर : **माधव नेने**

एम्. एस्सी.


विज्ञान प्रकाशन

पुणें २

किंमत दोन रुपये



REFBK-0010522

REFBK-0010522

प्रकाशिका :
श्रीमती उमाबाई नेने
१९९५, सदाशिव,
' विद्याविकास ' पुणें २.

प्रथमावृत्ति जानेवारी १९५९
' अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज '
या बोलपटाच्या निमित्तानें काढलेली
खास छोटी आवृत्ति सप्टेंबर १९६०.

मुखपृष्ठ : शि. द. फडणीस
आंतील रेखाचित्रें : एस्. के. दाणी

मुखपृष्ठावरील फोटो व पुस्तकांतील आर्टपेपरवरील फोटो, निर्माता मायकेल टॉडच्या ' अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज ' या बोलपटांतील असून बोलपटाचे भारतांतील वितरक ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्स कॉर्पो. ( इंडिया ) प्रा. लि. यांच्या खास परवानगीनें ते छापले आहेत.

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ... ७०५


# निर्माता मायकेल टॉड

**याचा जगांतील अति भव्य व सर्वांत अधिक गौरव केला गेलेला—'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' अर्थात् 'ऐशीं दिवसांत जगाची चक्कर' या बोलपटासंबंधीं माहिती—**

**बोलपटाचे भारतांतील वितरक—ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्स कॉर्पो० ( इंडिया ) प्रायव्हेट लिमिटेड.**

## बोलपटाचा—

**निर्माता**—मायकेल टॉड

**लेखक**—ज्यूल्स् व्हर्नच्या प्रख्यात कथेवर आधारलेला बोलपट.

**डायरेक्टर**—मायकेल अँडरसन.

**संगीत**—व्हिक्टर यंग

बोलपट टेक्नीकलर ( रंगीत ) आहे.

बोलपटास अमेरिकन चलच्चित्रपट असोसिएशनचीं पांच ॲकेडेमी ॲवॉर्डस ( ऑस्कर्स ) मिळालीं असून इतर बहुमानाचीं अशीं सुमारें ८० बक्षिसें अगर पदकें मिळालीं आहेत.

लांबी—बोलपट तब्बल तीन तास चालेल इतक्या लांबीचा आहे. त्यामुळें दिवसांतून या बोलपटाचे दोनच खेळ होऊं शकतात.

### ( १ ) रॉकेट उड्डाणापासून चित्रपटाची होणारी सुरवात :

'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' अर्थात् ऐशीं दिवसांत जगाची चक्कर या अति भव्य व वैभवशाली बोलपटाची सुरुवात तितक्याच नावीन्यपूर्ण व चित्ताकर्षक स्वरुपांत व्हावी अशी बोलपटाचा निर्माता मायकेल टॉडची

मनापासून इच्छा होती. यासाठीं त्यानें एका अभिनव पद्धतीचा उपयोग करण्याचें ठरविलें. दोन परस्परविरोधी दृश्यें पडद्यावर उभीं करून त्यांतून प्रेक्षकांच्या मनांत उत्कंठा निर्माण करण्याच्या तंत्राचा अवलंब करावयाचा असा त्यानें निश्चय केला.

प्रस्तुत बोलपटाच्या कांहीं प्रसंगांचें फ्रान्समध्यें चित्रीकरण चालू असतांना पॅरिस येथील एका पदार्थसंग्रहालयाच्या छोट्या सिनेगृहांत टॉडनें एक जुना बोलपट पाहिला व तो त्याच्या मनांत इतका भरला कीं, वरील कामासाठीं याच बोलपटाचा उपयोग करावयाचा असें त्यानें तेव्हांच ठरवून टाकलें. हा बोलपट म्हणजे जॉर्ज मेलीस् या फ्रेंच दिग्दर्शकाचा 'चंद्रलोकाकडे सफर' हा बोलपट होय. जॉर्ज मेलीस् हा शास्त्रीय विषयावरील बोलपट काढणाऱ्या दिग्दर्शकांचा अगदीं जनक समजला जातो. त्यानें 'चंद्रलोकाकडे सफर' हा बोलपट १९०२ सालीं काढला व तो ज्यूल्स व्हर्नच्या एका नांवाजलेल्या शास्त्रीय कथेवर आधारलेला आहे. तेव्हां 'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' या ज्यूल्स व्हर्नच्या बोलपटास नांदी म्हणून त्याच्याच एका जुन्या बोलपटाचा उपयोग करावयाचा ही कल्पना माइक टॉडला मोठी चित्ताकर्षक वाटली.

या दृष्टीनें त्यानें लगेच खटपटीस आरंभ केला. मात्र हें काम इतकें सहजसुलभ नव्हतें. सिने दिग्दर्शकांचा अगदीं अग्रणी अशा जॉर्ज मेलीस्नें सुमारें ४०००, लघुपट काढले होते. मात्र आज ते केवळ कांहीं खाजगी वस्तुसंग्रहालयांत तेथील 'दुर्मिळ चिजा' म्हणून पडून होते. माइक टॉडनें अखेर एक मोठी जबरदस्त किंमत देऊन हा लघुपट खरेदी केला व 'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज'चा तो एक भाग बनवून टाकला.

चित्रपटाची सुरुवात :

'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' या बोलपटाची सुरुवात पुढील प्रमाणें होते— सिनेमा सुरू होतांच जुन्या काळचें एक रॉकेट (अग्निबाण) स्फोट पावून वेगानें हवेंत उंचावर चढूं लागतें. पडद्यावर या रॉकेटचा आकार हळूहळू मोठा होत जातो आणि जॉर्ज मेलीस्च्या पुराण लघुपटांतले पांढरे काळे व नानाविध रंगाचे तारे पडद्यावर मोठ्या झग-

मगाटांत चमकूं लागतात. नंतर क्रमाक्रमानें या १९०२ सालच्या बोलपटांतील रॉकेटची जागा विसाव्या शतकांतील अगदीं हल्लींहल्लींच्या अद्ययावत् रॉकेटनें घेतली जाते. हें रॉकेट अधिक जोरानें स्फोट पावतें व मोठ्या झपाट्यानें वेग घेऊन अंतराळांतून प्रवास करूं लागतें, प्रेक्षक पण त्यावरील एक प्रवासी बनतो. आतां रॉकेटवरून आपण कोठें जाणार असा प्रेक्षकाला प्रश्न पडत आहे येवढ्यांत पडद्यावरील दृश्य झरकन् बदलतें व रॉकेट ऐवजीं रॉकेट पृथ्वीपासून दूर गेलें असतां त्यावरून पृथ्वीचा पृष्ठभाग दिसावा तसा देखावा पडद्यावर दिसूं लागतो. वरील दोन दृश्यांमधील विरोधाभासामुळें निर्माण होणाऱ्या आश्चर्य, उत्कंठा, उत्सुकता व हर्ष अशा वातावरणांत 'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' अशीं अक्षरें पडद्यावर झळकतात अन् मुख्य बोलपटाची मोठ्या वैभवानें आणि दिमाखानें सुरुवात होते.

## आश्चर्याचा आनंददायक अनुभव

रॉकेटवरून थेट अंतराळांत व क्षणार्धांत एकदम पृथ्वीच्या पृष्ठभागावर अशा दोन विरोधात्मक दृश्यांचा प्रेक्षकांच्या मनावर असा कांहीं जबरदस्त परिणाम होतो कीं, प्रेक्षक स्तिमित होऊन आपल्या जागेवर अगदीं चपापून बसतो व कांहीं काळ सर्वत्र एकच स्तब्धता निर्माण होते. बोलपटाच्या सुरुवातीस आवश्यक असणारें उत्कंठेचें वातावरण निर्माण होतें व पडद्यावर येणारीं पुढील दृश्यें पाहण्यासाठीं प्रेक्षक अधीर होऊन जातो. तो दुर्मिळ बोलपट मिळविण्यासाठीं माइक टॉडला पडलेले श्रम व करावा लागलेला खर्च या सर्वांची किंमत प्रेक्षकांवर या दृश्याची पडणारी जबरदस्त छाप पूर्ण भरून काढते.

## ( २ ) बोलपट म्हणजे अनेक प्रख्यात कलावंतांचा मेळावा.

अशा अत्यंत नाविन्यपूर्ण सुरवातीनंतर ज्यूल्स व्हर्नच्या कादंबरीवर आधारलेलें बोलपटाचें कथानक साहसाच्या आणि कल्पनाविलासाच्या नवनव्या दालनांत प्रवेश करतें. कथेचा नायक फिलिअस फॉग ( डेव्हिड निव्हेन ) व त्याचा नोकर पासपार्टू ( कॅन्टिन्फ्लास ) या दोन प्रवाशांनीं

अत्यंत घाई घाईनें उरकलेल्या पृथ्वी प्रदक्षिणेंत प्रेक्षक अगदीं समरस होऊन जातो.

आणि याच कथानकांत मूळ कथेची कसलीहि हानि होऊं न देतां अगर ज्यूल्स व्हर्नच्या मूळ कथानकाशीं कसलीहि विसंगति न आणतां निर्माता माइक टॉडनें इंग्लंड—अमेरिका व यूरोपच्या बोलपटसृष्टींतील सर्व नवे जुने नट व नटी पडद्यावर मोठ्या कौशल्यानें आणल्या आहेत.

एके काळीं प्रसिद्धीच्या अगदीं शिखरावर विराजमान असलेले गेल्या पिढींतील रोनॉल्ड कॉल्मन, पिटर लॉरी, जॉर्ज रॅफट ज्योइ ब्राऊन, फर्नांडेल, मार्लिन डिट्रिच इत्यादि कलावंतांबरोबर चालू पिढींतील शर्ली मॅकलीन, कॅन्टिन्फ्लास, डेव्हिड निव्हेन, रॉबर्ट न्यूटन यांसारखे कलावंत चमकतांना दिसतात. बोलपटसृष्टींतील सर्व नवे व जुने नट व नटी एकत्र चमकविण्याची माइक टॉडची एक मोठी आकांक्षा या अति साहसपूर्ण, चमत्कृतिजनक व टोलेजंग बोलपटांत पुरी झाल्यामुळें दुधांत साखर पडल्याचा आनंद कोठल्याहि रसिक प्रेक्षकाला झाल्यावांचून राहणार नाहीं. चालू व जुन्या पिढींतील नामवंत व प्रथम श्रेणींतील सुमारें पन्नासाहून अधिक सिनेकलावंतांचा बोलपटांत समावेश झाला असून पडद्यावर जणूं बोलपट सृष्टींतील गंधर्वांचा प्रचंड मेळावा भरला आहे असा भास होतो. प्रत्येक कलावंताला दिलेली भूमिका बोलपटाच्या कथानकाशीं इतकी सुसंगत आहे व ती त्यानें इतकी समाधानकारकपणें केली आहे कीं, सारा बोलपट म्हणजे एखाद्या कोड्याचा डाव एकत्र जोडावा तसा परिपूर्ण वाटतो. सिनेसृष्टींतील आपापल्या ओळखीचे व आवडीचे नवे व जुने कलावंत त्यांच्या एकाहून एक विचित्र भूमिकेतून ओळखून काढणें हा सुद्धां बोलपट पाहणाऱ्या प्रेक्षकांच्या आनंदाचा व करमणुकीचा एक भाग होतो.

परन्तु माइक टॉडनें ही मोठी अवघड गोष्ट कशी काय करून दाखविली ? इतके वेगवेगळ्या दर्जाचे व वेगवेगळ्या आवडी निवडीचे कलावंत मिळवून त्यांना बोलपटांत एकत्र आणणें म्हणजे काय साधीसुधी गोष्ट आहे ! परन्तु माइक टॉडच्या अंगीं असलेल्या दुसऱ्याचें मन वळविण्याच्या अपूर्व किमयेनें अखेर ही गोष्ट साध्य झाली आहे व बोलपट आहे या वैभव-

संपन्न, भपकेबाज व विलोभनीय देखाव्यांनीं युक्त अशा स्वरूपांत पाहण्याचें भाग्य प्रेक्षकांना लाभलें आहे.

टॉडनें यासाठीं काय काय खटपटी केल्या व हिकमती लढविल्या याचें सारें वर्णन करावयाचें झालें तर ती एक अद्‌भुत् कादंबरीच होईल. इतक्या मोठमोठ्या दर्जाच्या नामांकित नटांना साजेसा मुशाहिरा टॉडनें देऊं केला असतां तर त्याला किती पैसे खर्च करावे लागले असते याला कांहीं हिशेबच राहिला नसता. परंतु टॉडच्या वर वर्णन केलेल्या अपूर्व किमयेनें ही गोष्ट अखेर साध्य झाली आहे.

## प्रसिद्ध नट नोएल कोअर्डला कसें वश केलें ?

नोएल कोअर्ड या प्रसिद्ध नटास आपल्या बोलपटांत काम करण्याची विनंति करण्यास माइक टॉड त्याच्याकडे गेला त्या वेळीं हा नटश्रेष्ठ अमेरिकेंतील ‘ ला व्हेगास ’ या ठिकाणीं आठवड्याला ४०,००० डॉलर्स ( सुमारें २ लाख रुपये ) मिळवीत होता !

एखाद्या नटाचें मन वळवितांना टॉडचें हुकुमी वाक्य म्हणजे टॉडच्या या बोलपटांत काम केल्यानें नटामुळें बोलपटाला होणाऱ्या फायद्यापेक्षां त्या नटाचाच अधिक फायदा होणार होता. टॉडच्या प्रयत्नाला अखेर यश येऊन नोएल कोअर्ड अवघ्या २८० डॉलर्सना ( म्हणजे १४०० रुपयांवर ) टॉडच्या बोलपटांत काम करावयास तयार झाला.

फर्नांडेल ह्या फ्रेंच नटाचें मन वळविणें ही तर सर्वांत कठीण गोष्ट होती. मात्र टॉडनें या नटास अशी कांहीं लालूच दाखविली कीं, हा नट पण टॉडच्या जाळ्यांत सांपडला. टॉडनें फर्नांडेलला असें आश्वासन दिलें कीं, जगांतील अति भव्य अशा या बोलपटांत काम करण्याचें त्यानें कबूल केलें तर त्याचा चेहरा ६५ फूट लांब व २५ फूट रुंद या स्वरूपांत पडद्यावर दाखविण्याची तो व्यवस्था करणार होता. अखेर फर्नांडेल टॉडला म्हणाला, “ तू जर माझ्या पोशाखाची सर्व व्यवस्था करणार असशील तर माझी हरकत नाहीं. ” टॉडनें ताबडतोब पडत्या फळाची आज्ञा घेऊन फेर्नांडेलला स्टुडिओमध्यें नेलें व त्याच्या कामाचें चित्रीकरण करून टाकलें. येवढेंच काय फर्नांडेळनें बोलपटांत काम केलें आहे असें सांगून त्यानें

मार्टिनी कॅरोल या नटीस पण आपल्या बोलपटामध्यें काम करण्याबद्दल वश करून टाकलें.

सुप्रसिद्ध जर्मन चित्रचंद्रिका मार्लिन डिट्रीच ही हॉलिवूडमध्यें सर्वात हुषार व व्यवहारी नटी समजली जाते. कांहीं लोकांनीं टॉडला असें बजावलें कीं, मार्लिन डिट्रिचला आपल्या बोलपटांत काम करण्यासाठीं वश करणें ही एक अशक्य गोष्ट होती. मात्र टॉडनें या नटीचें मन वळविण्यासाठीं एक निराळाच उपाय शोधून काढला. तो तिला म्हणाला, " तुला देईन त्या प्रसंगाचें काम तूं कर व लगेच त्या चित्रीकरणाचा तेवढा भाग मी तुला पडद्यावर दाखवितों. आणि यदाकदाचित् तुला तुझें काम पसंत पडलें नाहीं तर चित्रपटाचा तेवढा भाग जाळून टाकण्याची मी व्यवस्था करीन." तिला असें आश्वासन देण्यांत टॉड सुमारें १५०,००० डॉलर्स ( ७॥ लाख रुपये ) इतक्या रकमेचा जुगार खेळत होता. अखेर अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील बार्बरी कोस्टच्या हॉटेल चालिकेचें काम तिला देण्यांत येऊन कसलीहि रंगीत तालीम न घेतां त्या प्रसंगाचें चित्रीकरण घेण्यांत आलें. आणि गंमत अशी कीं, मार्लिन डिट्रिचला तो प्रसंग इतका आवडला कीं, तिनें ताबडतोब आपली संमति देऊन टाकली.

फ्रँक सिनात्रा हा हॉलिवूडमधील एक भावनाप्रधान गायक व नट समजला जातो. त्यानें मात्र कसलेही आढेवेढे न घेतां बोलपटांत काम करण्याचें कबूल केलें.

चित्रपटांतील मुख्य पात्रांच्या भूमिका डेव्हिड निव्हेन, कॅन्टिन्फ्लास, रॉबर्ट न्यूटन व शर्ली मॅकलीन यांनीं केल्या आहेत. या कलावंतांबरोबरच चार्लस् बॉये, मार्टिन कॅरॉल, चार्लस् कोबर्न, हरमॉयनें गिनगोल्ड, बस्टर कीटन, एडमंड लोवे, सर सेड्रिक हार्डविक, ग्लिनिस जॉन्स, जॉन मिल्स, जॉर्ज रॅफ्ट, मार्लिन डिस्ट्रिच, नोएल कोअर्ड, फ्रँक सिनात्रा, रेड स्केल्टन, रॉबर्ट मोर्ले आणि कर्नल टीम मेकॉय हे अत्यंत ख्यातनाम व बड्यांतील बडे अभिनयपटु सुएझ, स्पेन, पॅरिस, हिन्दुस्थान, हॉंगकॉंग, जपान, सान्फ्रान्सिस्को इत्यादि सातासमुद्रावरील निरनिराळ्या ठिकाणीं आपापल्या अद्भुत व चमत्कृतिजनक भूमिकांत चमकतांना दिसतात.

अशा रीतीनें एकाच बोलपटांत ५० नामवंत सिने कलावंतांनीं एकत्र

काम केल्याचें जगांतील एकमेव उदाहरण म्हणजे माइक टॉडचा अति भव्य 'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' हा चित्रपट होय. आणि हे नामवंत कलावंत वगळून बोलपटाच्या तीन तासांच्या खेळांत पडद्यावर इतर जीं पात्रें चमकतांना दिसतात त्यांची संख्या पण आजवरच्या सर्व बोलपटांतील पात्रांच्या संख्येहून अधिक म्हणजे ६८,८९४ एवढी मोठी आहे. आणि हे सर्व माइक टॉडच्या नोकरवर्गांपैकीं म्हणून होते व त्यांचीं नांवें टॉडच्या नोकरवर्ग सूचीवर होतीं. या सर्व पात्रांसाठीं ७४,६८५ इतके पोशाख तयार करावे अगर भाड्यानें आणावे लागले होते.

एका बोलपटांत इतक्या दर्जाचे अभिनयपटु, गायनपटु व श्रेष्ठांतील श्रेष्ठ तंत्रज्ञ येवढ्या मोठ्या संख्येनें एकत्र आणणें हें एक अभूतपूर्व धाडस एक माइक टॉडसारखा श्रेष्ठ निर्माताच करूं जाणें व अशा स्वरुपाच्या गुणांचें मोजमाप करावयाचें झाल्यास त्याला टॉडव्यतिरिक्त दुसरें उदाहरणच नाहीं व त्याचें मोजमाप पण 'टॉडच्या इतकें मोठें' या मापानेंच करावयास हवें.

## ( ३ ) बोलपटाच्या चित्रीकरणासाठीं करावा लागलेला प्रवास

'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' या बोलपटाचें चित्रीकरण करण्यासाठीं बोलपटांतील कलावंतांना व तंत्रज्ञांना अक्षरशः सबंध जगाचा प्रवास करावा लागला आहे. कारण बोलपटांतील निरनिराळ्या देशांमधील प्रसंगांचें चित्रीकरण त्या त्या देशांतच जाऊन झालें पाहिजे याबद्दल टॉडचा अगदीं कटाक्ष होता. बोलपटाचें चित्रीकरण करणाऱ्या कॅमेरामन्स, साऊंड रेकॉर्डिस्ट इत्यादि तंत्रज्ञांना या एका बोलपटासाठीं सुमारें ४० लाख मैल इतका प्रवास करावा लागला आहे व हा सुद्धां आजवरच्या बोलपटसृष्टींतील उच्चांकच आहे. जगाच्या कानाकोपऱ्यांतील सुमारें १४० निरनिराळ्या ठिकाणीं या बोलपटाचें 'प्रत्यक्ष स्थळीं' म्हणून चित्रीकरण झालेलें आहे. याशिवाय खुद्द हॉलीवूड येथील सहा स्टुडिओज, व इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, हाँगकाँग, जपान, सयाम येथील स्टुडिओजचा पण या कामीं पुरेपूर उपयोग करून घेण्यांत आला आहे. आजवर कोणत्याही बोलपटांत उपयोगांत आणल्या नसतील अशा जागा, ठिकाणें, मौल्यवान वस्तू, जड-

जवाहिर, ऐतिहासिक स्थळें, मंदिरें, पुतळे इत्यादींचा या बोलपटासाठीं उपयोग करून घेण्यांत आला आहे व त्यासाठीं जगांतील दूरदूरच्या ठिकाणीं तंत्रज्ञांनीं प्रवास केला आहे.

## ( ४ ) प्रस्तुत बोलपटामुळें लोकांच्या बलून विद्येबद्दलच्या कुतूहलाचें झालेलें पुनरुज्जीवन

'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' या बोलपटाचा नायक फिलिअस फॉग आपला नोकर पासपार्तू याबरोबर पृथ्वीप्रदक्षिणा करावयास निघतो. परंतु त्याच्या प्रवासांत अनेक विघ्नें उपस्थित होतात. मात्र अशा संकटांनीं नामोहरम न होतां तो त्यांतून अनेक क्लृप्त्या योजून आपला मार्ग काढीत असतो लंडन येथें आपल्या सोबत्यांचा निरोप घेऊन तो आगगडीनें व बोटीनें पॅरिसला येऊन पोंचतो. मात्र पॅरीस ते मार्सेलिस् या आगगाडीच्या मार्गांत एक विघ्न उपस्थित होतें. कारण या भागांत एकाएकी एक हिमवादळ सुरू होतें व डोंगरावरून घसरत आलेल्या एका बर्फाच्या खडकानें त्यांच्या लोहमार्गावरील बोगदाच बंद होतो. मात्र फिलिअस फॉगसारख्या धाडसी व हिकमती वीराचें मन अशा संकटामुळें खची होत नाहीं. तो तांबडतोब एक बलून भाड्यानें ठरवितो व आपला नोकर पासपार्तू यासह या बलूनमधून आल्पस् पर्वतावरून उड्डाण करून आपला प्रवास चालू करतो. मात्र वादळी हवेमुळें त्यांचें बलून इच्छित मार्गाहून वेगळ्या दिशेनें जातें व ते दोघे स्पेनमध्यें येऊन पोंचतात. स्पेन देश बैलांच्या साठमारीसाठीं प्रसिद्ध आहे. पासपार्तू या कलेंत पारंगत असल्यामुळें तो अशा एका साठमारींत भाग घेतो. यांत त्यानें दाखविलेल्या धाडसावर व कौशल्यावर एक श्रीमंत व्यापारी इतका निहायत खूष होतो कीं, आपल्या मालकीच्या जहाजामधून तो त्यांची रवानगी मार्सेलिस् बंदराकडे करतो व त्यांच्या सुदैवानें येथून हिंदुस्थानकडे निघणारें एक जहाज त्यांना पकडतां येतें.

या बोलपटांतील आल्पस् पर्वतावरील बलूनच्या उड्डाणाचा देखावा असा कांहीं हृदयंगम रीतीनें चित्रित झाला आहे कीं, लोकांचें बलूनबद्दलचें कुतूहल पुन्हां नव्यानें जागृत झालें असून या क्रीडेचें या बोलपटामुळें पुनरुज्जीवन झालें आहे.

बलून एके काळीं फार कुतूहलाचा विषय होतें. मात्र आकाशयानाची नवनवीं वाहनें शोधलीं गेल्यामुळें बलूनबद्दलची उत्सुकता सर्वसाधारण लोकांत पुष्कळच कमी होत गेली.

बलून उड्डाणाचा पहिला प्रयत्न अमेरिकेंत ९ जानेवारी १७९३ सालीं पिअर ब्लांचार्ड या फ्रेंच माणसानें केला. हें बलून त्यानें कापडाचें केलें होतें व तें त्यानें स्वतः शिवलें होतें. बलूनमध्यें त्यानें हायड्रोजन वायु भरला होता. बलून उड्डाणाचा त्याचा हा प्रयोग त्यानें फिलाडेल्फिया संस्थानांतील जर्मन टाऊन येथें केला होता.

हा प्रयोग पाहण्यासाठीं भावनाविवश झालेल्या लोकांची नुसती तोबा गर्दी त्या ठिकाणीं लोटली होती. या गर्दीतच अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा संस्थापक व पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन व त्याबरोबर थॉमस जेफरसन, पॉल रिव्हिएर, जॉन ॲडॅम्स आणि हेन्री क्ले यांसारखी बडीबडी मंडळी उपस्थित होती.

'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' या बोलपटांत दिसणारें बलून मात्र कापडाऐवजीं ' व्हिनिल ' नांवाच्या प्लास्टिक सदृश पदार्थापासून बनविलेलें आहे. त्याला जोडलेली वेताची टोपली वगळली तर त्याचें वजन अवघें दहा पौंड भरतें. त्यांत ज्वालाग्राही नसणारा ' हेलियम ' वायु भरला असून तें बोलपटांतील नायक डेव्हिड निव्हेन व त्याचा नोकर कॅन्टिन्फलास यांना घेऊन आकाशांत ५००० फुटांपर्यंत उंच जातें.

अमेरिकेच्या बलून क्लबाकडून टॉडनें हें उसने मागून घेतलें होतें. १९५७ सालीं युरोपमध्यें झालेल्या आंतरराष्ट्रीय बलून शर्यतींत या बलूननें भाग घेतला आहे.

बोलपटांतील आल्पस् पर्वतावरील बलून उड्डाणाचें दृश्य पाहून इंग्लंड, युरोप व अमेरिकेंत बलूनचें इतकें स्तोम माजलें आहे कीं, हल्लीं लोक इतर वाहनांऐवजीं बलूनच्याच शर्यती खेळूं लागले आहेत. कारण तुलनात्मक दृष्ट्या बलून कमी खर्चाचें, साहसाचें व संकटाचें व इच्छित स्थळीं नेमकें केव्हां पोंचेल याचा बरोबर पत्ता लागत नसल्यामुळें प्रेक्षक वर्गांत उत्कंठा व ईर्षा निर्माण करणारें अशा अनेक दृष्टीनें शर्यतीसारख्या क्रीडेची हौस असणाऱ्यांचें चित्त आकर्षून घेण्यास पुरेपूर समर्थ आहे.

## ( ५ ) जगांतील सर्वांत भव्य व सर्वांत अधिक गौरव झालेला बोलपट

निर्माता माइक टॉडचा ‘ अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज ’ हा बोलपट जगांतील सर्वांत भव्य बोलपट असून जगांतील सर्वांत अधिक गौरव केला गेलेला बोलपट असें दुहेरी मानाचें स्थान पटकावणारा झाला आहे.

या बोलपटांतील निरनिराळ्या विभागांना अमेरिकन चलच्चित्रपट असोसिएशनचीं सर्वोच्च अशीं ५ अॅकेडेमी अॅवॉर्ड्स्(ऑस्कर्स)मिळालीं आहेत. एखाद्या बोलपटास एक अॅकेडेमी अॅवॉर्ड मिळालें तरी ती एक मोठी मानाची गोष्ट समजली जाते. मग एका बोलपटास ५ अॅकेडेमी अॅवॉर्ड्स् मिळणें म्हणजे ती तर एक अत्युच्च मानाची गोष्ट समजावयास हवी. हीं पांच अॅकेडेमी अॅवॉर्ड्स् बोलपटांतील खालीं दिलेल्या विभागांना आहेत.

( १ ) त्या वर्षींचा सर्वांत उत्कृष्ट बोलपट
( २ ) उत्कृष्ट पटकथा
( ३ ) उत्कृष्ट संगीत
( ४ ) उत्कृष्ट रंगीत चित्रीकरण
( ५ ) उत्कृष्ट संकलन

यांशिवाय इतक्याच बहुमानाचीं अशीं सुमारें ८० बक्षिसें, पदकें इत्यादि मानमरताबें निरनिराळ्या संस्था, मंडळें, टीकाकार, वृत्तपत्रसंस्था व अनेक राष्ट्रांकडून या बोलपटास मिळालीं आहेत.

अमेरिकेच्या प्रसिद्ध ‘ न्यूज विक मॅगेझीन ’ या मासिकानें ‘ रजतपटसृष्टीच्या इतिहासांतील सर्वांत नावीन्यपूर्ण व कलापूर्ण करमणूक ’ म्हणून या बोलपटाचा गौरव केला आहे. नेहमीं सौम्य अभिप्राय देणाऱ्या ‘ न्यूयॉर्क टाइम्स ’ नें तर ‘ टॉडनें या बोलपटानें आजवरचे सर्व भव्य व वैभवशाली बोलपट मागें सारले आहेत ’ असा निर्वाळा दिला आहे. याशिवाय इंग्लंड व युरोपमधील सर्व छोट्या-मोठ्या मासिकांनीं व वृत्तपत्रांनीं या बोलपटाची फार तारीफ केली आहे.

आपल्या अपूर्व व भपकेबाज प्रदर्शन चातुर्याला साजेल अशा दिमाखानें निर्माता माइक टॉडनें तीन तासांच्या या खेळांत अनेक प्रसंग, घटना

व जुनीं वैभवें पडद्यावर उभीं केलीं आहेत. त्यांतील कांहीं गोष्टींचा उल्लेख करावयाचा तर स्पेनमधील बैलांच्या साठमारीचें अत्यंत रोमहर्षक दृश्य. यांत पासपार्टू ( कॅन्टिन्फ्लास ) यानें धाडस व विदुषकी यांचा असा सुंदर समन्वय साधला आहे कीं, हें दृश्य पडद्यावर प्रत्यक्ष पाहिल्यावांचून त्याची गोडी कळणेंच अशक्य आहे. सयामच्या राजाची पाण्यावरील नौका व त्यावर वल्ही मारणारे १० वल्हीवाले ह्या दृश्यांतील राजे लोकांचें जुनें वैभव पाहून मनुष्य थक्क होऊन जातो. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील रानटी मुलखांतून जात असतांना वाटेंत मोडका पूल आहे असें कळतांच इंजिन ड्रायव्हर गाडी तशीच वेगानें सोडतो व गाडी पुलावरून जात आहे तों तिच्या पाठोपाठ पूल कोलमडून खालीं कोसळतो हें दृश्य पाहतांना कोणत्याही प्रेक्षकाच्या अंगावर कांटा उभा राहिल्यावांचून राहणार नाहीं. त्याचप्रमाणें सान्फ्रांन्सिस्को येथील निवडणूक प्रसंगीं भरलेला प्रचंड मेळावा, त्यांत लोकांची चाललेली मैफल, निवडणुकींत अचानक उडालेली दंगल व त्यामुळें सर्वत्र उडालेलें गडबड व गोंधळाचें वातावरण या गोष्टी प्रेक्षकांस अगदीं भावनाविवश केल्यावांचून रहात नाहींत. याशिवाय सान्फ्रांन्सिस्को ते न्यूयॉर्क या मार्गावरील रानटी मुलुखांतून प्रवास चालू असतांना कर्नल स्टॅंप प्रॉक्टर या अमेरिकन माणसाबरोबर फिलिअस फॉगची झालेली बोलाचाली व त्यानें दिलेलें पिस्तुलाचें आव्हान आणि याच वेळीं कांहीं रानटी टोळीवाल्यांनीं आगगाडीवर केलेला अचानक हल्ला, गाडींतील सर्व लोकांनीं मोठ्या धैर्यानें त्याचा केलेला प्रतिकार, एका उतारावर इंजिनावांचून धावणाऱ्या गाडीचें अत्यंत भीतीदायक स्वैर पलायन इत्यादि प्रसंगांचें अगदीं खरेंखुरें चित्रण आजवरच्या सर्व धाडसी बोलपटांतील प्रसंगांना मागें टाकील असें वास्तवपूर्ण झालें आहे. यानंतर पश्चिमेकडील सपाट मुलुखावरून शिडाच्या सहाय्यानें जमिनीवर घसरणाऱ्या एका घसरगाडीचें दृश्य आणि सरते शेवटीं महासमुद्रामधून जाणाऱ्या एका प्रचंड दुकाठी गलबतावरील इंधन संपल्यामुळें गलबतावरील खुर्च्या, टेबलें, डोलकाठ्या इत्यादि लांकडी सामान मोडून तोडून तें जाळलें जाण्याचें महाभयानक दृश्य इत्यादि प्रसंग तुमच्या अंतःकरणाचा ठाव घेतल्यावांचून राहाणार नाहींत.

## ( ६ ) जगांतील महान् कौटुंबिक चित्रपट

लहान मुलांना व मोठ्या माणसांना सारखाच प्रिय वाटेल असा बोलपट क्वचितच असूं शकतो. मात्र माइक टॉडचा ' अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज ' हा बोलपट सानथोरांना सारखाचं मनोरंजक व आनंददायक वाटतो. भारत सरकारनें तर या बोलपटाला युनिव्हर्सल ( सर्वांसाठीं ) हें सर्टिफिकेट देऊन सर्वांस हा बोलपट पाहण्याची पूर्ण मुभा देऊन या बोलपटाचा एक प्रकारें गौरवच केला आहे.

अमेरिकेंतील शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्थांनीं या बोलपटाबद्दल फार मोठे प्रशंसोद्गार काढले असून तो सर्वांनीं न चुकतां पहावा म्हणून एकमुखानें शिफारस केली आहे.

अमेरिकेचे ' टॉमस आल्वा एडिसन ' हें बहुमानाचें पारितोषिक ' अमेरिकेचा त्या वर्षीचा मुलांचा सर्वांत उत्तम बोलपट ' म्हणून या बोलपटास मिळालें आहे. त्याचप्रमाणें ' पालकांचें मासिक ' या मासिकानें या बोलपटास ' उत्कृष्ट कौटुम्बिक बोलपट ' म्हणून एक रौप्यपदक बहाल केलें आहे. याशिवाय कौटुम्बिक विषयांवर भर देणाऱ्या इतर मासिकांनीं व अनेक टीकाकारांनीं त्या वर्षीचा अमेरिकेंतला सर्वोत्कृष्ट बोलपट म्हणून या बोलपटाची निवड केली आहे.

## ( ७ ) बोलपटाची लांबी व काल

सर्वसाधारण इंग्रजी बोलपट १ तास ३० मिनिटे ते १ तास ४५ मिनिटें चालतील इतक्या लांबीचे असतात. परन्तु मायकेल टॉडचा ' अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज ' हा बोलपट प्रेक्षकांची तब्बल तीन तासपर्यंत करमणूक करतो. तीन तास चालणारा व अनेक रोमहर्षक, चित्तथरारक, नयनरम्य व आनंददायक अशा प्रसंगांनीं नटलेला हा बोलपट पाहून प्रेक्षक मोठ्या तृप्त मनानें सिनेमागृहाच्या बाहेर पडतो. तीन तासांच्या या नेत्रदीपक करमणुकींत एका मोठ्या जंगी सर्कशीला जत्रेला किंवा जलशाला आल्याप्रमाणें प्रेक्षक आनंदांत मशगूल होतो. सबंध बोलपटांत विडंबन व वक्रोक्ति यांचा सुंदर समन्वय असून जगांतील कानाकोपऱ्यांत जेथें जेथें म्हणून हा

बोलपट लागला तेथें तेथें या बोलपटाचें आबालवृद्धांकडून सारख्याच हर्षानें स्वागत झालें आहे. अमेरिका, इंग्लंड व ऑस्ट्रेलिया या तीन देशांत हा बोलपट सतत दोन वर्षें चालला होता ! यावरून या बोलपटाच्या गुणांची व लोकप्रियतेची सहज कल्पना येईल.

पालकांची राष्ट्रीय संघटना, शिक्षकांचें मंडळ, चर्चमध्यें काम करणाऱ्या महिलांचें मंडळ, प्रॉटेस्टंट चलच्चित्रपट कमिटी, राष्ट्रीय महिला मंडळ इत्यादि अमेरिकेंतील अनेक संस्थांनीं या बोलपटाचा वेळोवेळीं खास गौरव केला आहे व बोलपटाला बहुमानाचीं अनेक बक्षिसें व पदकें बहाल केलीं आहेत.

## ( ८ ) बोलपटांतील जडजवाहीर, जुनीं वैभवें

तीन तासांच्या भरगच्च प्रसंगांनीं विभूषित अशा या बोलपटाला साजेसें जडजवाहिर, विभूषणें, प्राचीन वैभवें इत्यादींचें मोठें नेत्रदीपक प्रदर्शन टॉडनें प्रस्तुत बोलपटांत केलें आहे.

यांत विशेष उल्लेखनीय म्हणजे सयामच्या राजाची अति भव्य व प्राचीन अशी नौका. ही शेकडों वर्षांची जुनी नौका १६५ फूट लांबीची असून त्यांत एक रत्नजडित सिंहासन पण आहे. नौका चालविण्यास वल्ही मारण्यासाठीं नव्वद लोकांची त्यांत सोय आहे. दुसऱ्या एका प्रसंगांत कालीमातेची एक जुनी मूर्ति पाहावयास मिळते. या सुवर्ण मूर्तीची किंमत ७ लाख रुपये इतकी आहे. चित्रपटांत जपान मधील जीं दृश्यें आहेत त्यांत ‘ कामाकुरा ’ येथील गौतमबुद्धाचा ‘ आमीडा ’ या नांवानें प्रसिद्ध असलेला अति भव्य असा पुतळा पहावयास सापडतो. जगांत जे काय थोडे असे अति प्राचीन पुतळे आहेत त्यांत हा मोडतो. हा पुतळा ५० फूट उंच असून तो तांबें व कथील यांच्या मिश्रधातूपासून ( ब्रॉंझ ) बनविलेला आहे. या पुतळ्याची आज किंमत करणें हीच एक कठीण गोष्ट आहे. बोलपटांतील लंडन शहरामधील प्रसंगांत जीं अनेक घड्याळें दिसतात त्यांची संख्या १४७ असून तीं सर्व १९ व्या शतकांतील आहेत. त्यांतील प्रत्येक घड्याळाची किंमत सुमारें २५ हजार रुपये भरेल ! या सर्व घड्याळांचा विमा इंग्लंडमधील प्रसिद्ध ‘ लॉइडस् ’ कंपनीनें उतरविला आहे.

## ( ९ ) या बोलपटानें बोलपटसृष्टीला पुन्हां चांगले दिवस येणार:

हल्लीं इंग्लंड अमेरिकेंत घरोघर टेलिव्हिजन सेटस् प्रचारांत आल्यामुळें घरच्या घरीं मोठमोठीं नाटकें ऑपेराज् वगैरे पाहण्याची सोय झाली आहे. साहजिकच याचा परिणाम बोलपट धंद्यावर झाला आहे. मात्र 'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज ' या बोलपटांतील शौर्य, साहस, प्रवासाची हौस, विडंबन, वक्रोक्ति या सर्वांच्या सुरेख संगमामुळें हा बोलपट लोकप्रियतेच्या इतक्या शिखरापर्यंत जाऊन पोचला आहे कीं, टेलिव्हिजनच्या नित्यवापरामुळें बोलपट सृष्टीला आलेला पडता काळ जाऊन बोलपट व्यवसायाला पुन्हां ऊर्जितकाळ प्राप्त होईल असा विश्वास या धंद्याबद्दल आस्था बाळगणाऱ्या लोकांच्या मनांत उत्पन्न झाला आहे.

माइक टॉडनें प्रोड्यूसर म्हणून काढलेला हा पहिलाच ( व दुर्दैवानें अखेरचाच ! ) चित्रपट परंतु यांतच त्यानें प्रेक्षकांच्या सर्व अपेक्षा अगदीं पुरेपूर पूर्ण केल्या आहेत. येवढेंच काय धाडसी व साहसमय जगपर्यटनाच्या बोलपटाला उत्तम कथानक मिळवून त्यानें बोलपटाच्या सर्व बाजू बळकट केल्या आहेत.

## (१०) बोलपटांतील भूमिका

कथेचा नायक याचें काम डेव्हिड निव्हेन या प्रख्यात इंग्लिश नटानें केलें आहे. ज्यूल्स व्हर्ननें रंगविलेल्या नायका बरहुकूम त्यानें आपली भूमिका वठविली आहे. फिलिअस फॉग हा एक नमुनेदार इंग्लिशमन असून सर्व साधारण इंग्लिश माणसाला वेळेबद्दल असणारें प्रेम, इंग्लिश माणसाचा घड्याळाप्रमाणें रेखीव वक्तशीरपणा व काटेकोरपणा या गोष्टी या भूमिकेनें फार यशस्वीरीत्या प्रतिबिंबित झाल्या आहेत.

फिलिअस फॉग आपल्या सोबत्यांशीं पैज मारून आपल्या इमानी व धाडसी नोकराबरोबर जगाच्या प्रवासास निघतो व वाटेंत येणाऱ्या अनेक अडचणींना जिद्दीनें तोंड देतो असा या बोलपटांतील कथाभाग आहे. या नोकराचें—पासपार्तूचें काम मेक्सिकोचा विनोद सम्राट समजला जाणारा नट कॅन्टिन्फलास यानें केलें आहे. अनेक टीकाकारांनीं या नटास 'चार्ली

चॅप्लीनच्या तोडीचा नट ' इतक्या वरच्या रांगेंत बसविलें आहे. अमेरिकन चित्रपटांत मात्र त्याचें हें पहिलेंच काम आहे. या नटानें केलेल्या अनेक विदुषकी करामती पाहून प्रेक्षकांची हंसता हंसता पुरेवाट होते.

जगाचा फेरा ८० दिवसांत पुरा करण्यासाठीं नायकाला करावा लागलेला आटापिटा याचें मोठें मनोवेधक चित्रण प्रोडयूसर टॉडनें केलें आहे. या दोन प्रवाशांच्या मार्गांत येणारे नैसर्गिक अडथळे व फिक्स नांवाच्या डिटेक्टिव्हनें कांहीं गैरसमजुतीमुळें त्यांचा केलेला पाठलाग व त्यांच्या मार्गांत उपस्थित केलेलीं विघ्नें, व प्रवास ८० दिवसांतच पुरा झाला पाहिजे हें वेळेचें बंधन या सर्वांमुळें बोलपटांत परमावधीची उत्कंठा भरलेली आहे.

माइक टॉडनें बोलपटांत कसकसलीं वाहनें प्रदर्शित केलीं आहेत याला कसला सुमारच राहिलेला नाहीं. बग्गी, आगगाडी, निरनिराळ्या प्रकारचीं गलबतें, जहाजें, तराफे, हवेंत तरंगणारें बलून, संथ गतीनें जाणारा हत्ती, रिक्षा, शिडाच्या सहाय्यानें जमिनीवर सरकणारें जमीन जहाज इत्यादि. येवढीं वाहनें पुरी नाहींत म्हणूनच कीं काय, डिटेक्टिव्ह फिक्स एका शहा-मृगाच्या गाडींतून या दोन वीरांचा पाठलाग करतो असें पण दृश्य प्रस्तुत बोलपटांत आलें आहे !

चित्रपटाचें रंगीत चित्रीकरण फारच सुंदर आहे. व्हिक्टर यंगनें दिलेलें संगीत मधुर आहे. एकट्या कॅन्टिन्फ्लासचें विनोदी व विदुषकी काम इतकें हास्यस्फोटक झालें आहे कीं, संबंध बोलपट केवळ त्याच्या एकट्याच्या कामानेंच यशस्वी होऊं शकला असता. परंतु फिलिअस फॉग या हिशोबी, कांटेकोर, वक्तशीर व धडाडीच्या ब्रिटिश माणसाची भूमिका डेव्हिड निव्हेन या नटानें इतकी तद्रूपतेनें केली आहे कीं, आजवरच्या त्याच्या सर्व भूमिकांत त्याची ही भूमिका सर्वांत सरस आहे, याबाबत टीकाकारांचें एकमत आहे. डिटेक्टिव्ह फिक्सचें काम रॉबर्ट न्यूटन या कसलेल्या नटानें फार उत्तम वठविलें आहे.

औधा या हिंदी महाराणीचें काम शर्ली मॅकलीन या अमेरिकन नटीनें फार सुंदर केलें आहे. हिंदी वेषभूषेंतील तिचें काम सर्वांचा एक कुतूहलाचा विषय

होऊन बसेल. या बोलपटानें बोलपटसृष्टींतील आजवरचे सर्व उच्चांक मोडून स्वतःचा असा एक नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे.

'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' या अतिभव्य, वैभवसंपन्न बोलपटाचा निर्माता मायकेल टॉड यानें या चित्रपटाच्या जाहिरातीकरितां प्रचंड योजना आंखल्या होत्या. बोलपटाच्या उद्घाटनप्रसंगीं निमंत्रित पाहुण्यांसाठीं लाखो डॉलर्स खर्चून शॅम्पेनची नदीच त्यानें वाहवली होती! एलिझाबेथ टेलर ही त्याची पत्नी. पुढें विमानांतून प्रवास करीत असतां विमानाला अपघात होऊन माइक टॉड मरण पावला. शिकागो येथें त्याची कबर बांधण्यांत आली आहे. 'पट्टीचा प्रसिद्धीपटु' म्हणून गाजलेल्या या निर्मात्याचें स्थान सिनेसृष्टींत कित्येक वर्षेंपर्यंत अढळ असें राहील.

## मायकेल टॉडचा

नेत्रपदीपक व जगांतील सर्वांत भव्य व सर्वांत अधिक गौरव झालेला
बोलपट 'अराउंड दि वर्ल्ड इन् एटी डेज' या बोलपटांतील
भूमिका व पात्रयोजना

| भूमिका | पात्र योजना |
|---|---|
| एक धाडसी प्रवासी ( कथेचा नायक ) फिलिअस फॉग... | डेव्हिड निव्हेन |
| फिलिअस फॉगचा इमानी नोकर पासपार्तू... | कॅन्टिन्फ्लास |
| फिलिअस फॉगचा सबंध प्रवासभर पाठलाग करणारा डिटेक्टिव्ह—फिक्स... | रॉबर्ट न्यूटन |
| हिन्दी महाराणी 'औधा'... | शर्ली मॅकलीन |
| थॉमस कुक ट्रॅव्हल एजन्सीचा मॅनेजर मॉसिए गास... | चार्लस् बॉये |
| फोर्ट केआर्नी येथील स्टेशनमास्तर... | ज्यो. इ. ब्राऊन |
| पॅरिस येथील नखरेल प्रवासी... | मार्टिनी कॅरोल |
| सान्फ्रान्सिस्को येथील एक राजकीय व्यक्ति--कर्नल स्टॅम्प प्रॉक्टर... | जॉन कॅराडाईन |
| हॉंगकॉंग येथील जहाजकंपनीच्या कचेरींतील कारकून... | चार्लस् कोबर्न |

| | |
|---|---|
| हिंदुस्थानांतील रेल्वेवरील अधिकारी... | रोनॉल्ड कोलमन् |
| मंगोलिया जहाजावरील मुख्य बटलर (आचारी)... | मेलव्हिल कूपर |
| लंडन येथील नोकऱ्या देणाऱ्या एजन्सीचा मॅनेजर —रोलँड हेस्केथ—बॅगॉट... | नोएल कोअर्ड |
| सुधारणावादी क्लबाचा एक सभासद व फिलिअस फॉगचा पत्त्यांच्या खेळांतील जोडीदार... | फिन्ले क्यूरि |
| मुंबईच्या पोलीस खात्याचा मुख्य... | रेइनाल्ड डनी |
| 'हेन्रीएटा' जहाजावरील मुख्य खलाशी... | अँन्डी डेव्हाइन |
| 'सान्फ्रांन्सिस्को' येथील 'बार्बरी कोस्ट सलून' या मद्यपानगृहाची चालिका.... | मार्लिन डिट्रिच |
| स्पेनमधील चिंचॉन येथील साठमारी करणारा... | लुईस मिग्युईल डोमिन्ग्युईन् |
| पॅरिस येथील बग्गीवाला... | फर्नांडेल |
| फिलिअस फॉगचा पासपार्तूच्या आधीचा नोकर—फॉस्टर... | सर जॉन गुइलगूड |
| लंडन येथील मद्यपानगृतांतील गुलहौशी स्त्री... | हरमायने गिनगोल्ड |
| स्पेन येथील 'केव्ह ऑफ दि सेव्हन विंडस्' मधील नर्तक... | होसे ग्रेको |
| मुंबई ते बनारस या प्रवासांत फिलिअस फॉगचा सहप्रवासी ब्रिग्रेडिअर जनरल सर फ्रेन्सिस क्रोमार्टी... | सर सेड्रिक हार्डविक |
| सुधारणावादी क्लबाचा एक सभासद व फॉगचा पत्त्यांतील खेळाडू फलांतीन् | ट्रेव्हॉर हॉवर्ड |
| लंडन येथील मद्यपानगृहांतील एक आतषबाज्... | ग्लिनिस जोन्स |
| कॅलिफोर्नियाच्या सेंट्रल पॅसिफिक रेल्वे रस्त्यावरील गाडींतील तिकिटें देणारा... | बस्टर कीटन |
| पॅरिसच्या व्हेंडोम येथील एक नखरेल तरुणी... | एव्हेलिन कीस् |
| लंडन येथील पुनरुज्जीवन पंथाचा कॅप्टन... | बिआट्रिस लिल् |
| 'कार्नाटक' जहाजावरील जपानी बटलर... | पिटर लॉरी |

| | |
|---|---|
| ' हेन्रीएटा ' जहाजावरील इंजिनिअर... | एडमंड लोए |
| ' हेन्रीएटा ' जहाजावरील सुकाणूं चालविणारा... | व्हिक्टर मॅक्लाग्लेन |
| फोर्ट केआर्नी येथील अमेरिकन घोडदळाचा मुख्य... | कर्नल टिम मॅकॉय |
| लंडन येथील सुधारणावादी क्लबाचा एक सभासद... | ए. इ. मॅथ्यूज् |
| हॉंगकॉंग येथील समुद्राजवळ असलेल्या हॉटेलांतील एक व्यक्ति... | माइक माझूर्की |
| लंडन येथील दारू पिऊन उचक्या देणारा घोडागाडीवाला... | जॉन मिल्स |
| सुएझ येथील ब्रिटिश वकील... | ॲलन मोब्रे |
| इंग्लंडच्या बॅंकेचा गव्हर्नर व फॉगचा पत्त्याच्या खेळांतील खेळाडू, मिस्टर राल्फ... | रॉबर्ट मोर्ले |
| सिनेमाच्या सुरुवातीचा निवेदक | एडवर्ड आर् मरो |
| ' हेन्रीएटा ' जहाजाचा कॅप्टन कॅ. स्पिडी | जॅक ओके |
| मार्लिन डिट्रिचच्या मद्यपान गृहांतील ताकदवान मनुष्य. याचें काम म्हणजे दारू पिऊन फार झिंगून गोंधळ घालतील त्यांना उचलून मद्यपानगृहाच्या बाहेर फेकणें असें असतें. अशा माणसाला इंग्रजींत ' बाउन्सर ' म्हणजे ' फेकणारा ' असें म्हणतात. | जॉर्ज रॅफ्ट |
| टॅन्जीअर्समधील श्रीमान् मनुष्य अच्मण अब्दुल्ला | गिलबर्ट रॉलॅंड |
| अच्मण अब्दुल्लाचा एक अनुयायी... | सिझर रोमेरो |
| सान्फ्रांन्सिस्को येथील बार्बरी कोस्ट सलूनमधील पियानो वाजविणारा... | फ्रॅंक सिनात्रा |
| ' बार्बरी कोस्ट सलून ' मधील दारू पिऊन झिंगलेला | रेड स्केल्टन |
| सुधारणावादी क्लबाचा एक सभासद.... | रोनॉल्ड स्क्वायर्स |
| सुधारणावादी क्लबाचा एक सभासद... | बेसिल सिडने |
| लॉइडस्मधील स्कॉटलंड यार्डचा गुप्त पोलिस... | रिचर्ड वाटीस् |
| सुधारणावादी क्लबांतील हिन्शॉ नांवाचा एक नोकर | हार्टकोर्ट विल्यम्स |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.



# — ज्यूल्स् व्हर्न —

ज्यूल्स् व्हर्नेचा जन्म ८ फेब्रुवारी १८२८ रोजीं फ्रान्समधील ‘ नानटेस् ’ या शहरीं झाला. त्याचे वडील पिअर व्हर्ने हे नानटेस् येथें एक प्रख्यात वकील होते.

पिअर व्हर्ने यांचीं अशीलें बहुधा दर्यावर्दी लोकांमधील असत व त्यांचें सर्व कामकाज दर्यावर्दी लोकांच्या संबंधींचें असे. त्यामुळें बंदरांच्या जवळपासच त्यांना रहावें लागे. त्या काळांत पूर्वेकडील देशांत जाऊन शौर्य गाजवून संपत्ति मिळवून आणण्याची ईर्षा अनेक महत्वाकांक्षी लोकांच्या मनांत असे. या साहसमय जीवनाची पूर्वपीठिका तरुण ज्यूल्स् व्हर्नेच्या मनावर लहानपणापासून निर्माण झाली आणि या सुखस्वप्नांच्या पार्श्वभूमिकेवरच तो आपल्या पुढील कथा रंगवूं शकला.

वयाच्या सहाव्या वर्षी तो शाळेंत जाऊं लागला. ही शाळा एका विधवा स्त्रीनें चालविलेली होती. तिचा नवरा जहाजावर कप्तान होता. एका वादळांत बोट सांपडून समुद्रावर तो मरण पावला होता. या

बाईनें वेळोवेळीं सांगितलेल्या दर्यावर्दी गोष्टींचा परिणाम लहानग्या ज्यूल्स्च्या मनावर होऊन त्याच्या कल्पनाशक्तीला अधिक चालना मिळाली.

१८३७ सालीं आपल्या धाकट्या भावाबरोबर तो हायस्कुलांत जाऊं लागला. खेळांत त्यानें बरेंच प्रावीण्य दाखविलें. अभ्यासांत मात्र तो फारसा चमकला नाहीं.

१८३९ सालच्या उन्हाळ्यांत इतर दोघां मित्रांबरोबर हिंदुस्थानला निघालेल्या एका जहाजांतून पळून जाण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु त्याच्या बापास याची बातमी लागल्यामुळें हा प्रयत्न अयशस्वी ठरला. यानंतर मात्र ज्यूल्स्नें केवळ आपल्या कल्पनासृष्टींतूनच प्रवास करावयाचा असा निश्चय केला.

वयाच्या सोळाव्या वर्षी आपल्या वडिलांच्या कचेरींत कारकून म्हणून तो काम शिकूं लागला. याच वेळीं त्यानें लेखनास आरंभ केला. मात्र या गोष्टीचा त्यानें आपल्या घरच्या मंडळीस पत्ता लागूं दिला नव्हता. कांहीं काळ पॅरिसला जाऊन वकिलीची पहिली परीक्षा त्यानें दिली व नानटेस् येथें तो परत आला.

१८४८ सालीं, पुन्हां पॅरिसला जाऊन आपल्या वकिलीचा राहिलेला अभ्यासक्रम त्यानें पुरा केला. मात्र त्याच्या मनांतील इच्छा नाटकें लिहून वाङ्मयीन क्षेत्रांत नांव मिळवावें अशीच होती. या काळांत त्यानें दोन तीन नाटकें पण लिहिलीं. त्याच्या वडिलांना या गोष्टीचा मनांतून अभिमान वाटत असला तरी चरितार्थाच्या दृष्टीनें नानटेस् येथें परतून वकिलींतच लक्ष घालण्याचा त्यांनीं आपल्या मुलास सल्ला दिला. परंतु ज्यूल्स्चा निर्धार त्याचा खरा व्यवसाय जो लेखनव्यवसाय यांतच आपलें लक्ष घालावें असा होता.

पॅरिस येथें कांहीं काळ राहून चरितार्थासाठी तो वकिली करी व

फावल्या वेळांत निरनिराळ्या मासिकांतून शास्त्रीय स्वरूपाच्या ऐतिहासिक गोष्टी तो लिहूं लागला. त्याचें एक नाटक या काळांत थोडेंफार गाजलें. नंतर कॅलिफोर्नियांत सोन्याच्या शोधासाठीं अनेक लोक जात होते. तेथें जाऊन नशीब काढावें असा विचार त्याच्या मनांत आला. परंतु लेखनव्यवसाय करण्याचा विचारच अधिक बलवत्तर ठरला. शास्त्रावर आधारलेल्या काल्पनिक कथा लिहून त्या मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध करून पैसा व नांव मिळविण्याची त्यानें एक योजना मनांत आखली. त्या काळीं मोठमोठे शास्त्रीय शोध नुकतेच लागले होते व शास्त्राचें महत्त्व नुकतेंच कोठें लोकांच्या लक्षांत येऊं लागलें होतें. शास्त्र हें मानवाच्या सुखाचा व समृद्धीचा एक ठेवा आहे हें लोकांना नुकतेंच कोठें पटूं लागलें होतें. शास्त्राच्या प्रगतीबरोबर जगांत पुढें काय काय शोध लागतील व त्यांचा मानवाच्या जीवनावर काय काय परिणाम होईल यावर कल्पनाशक्ति चालवून त्या कल्पनांवर आधारित कथा लिहून नांव व पैसा मिळविण्याचा त्यानें निश्चय केला.

कांहीं काळ बापाच्या विनंतीस मान देऊन त्यानें एक नोकरी पत्करली. मात्र राहिलेल्या वेळांत आपलें लेखनकार्य त्यानें अव्याहत चालू ठेवलें. निरनिराळ्या मासिकांतून गोष्टी, लेख वगैरे लिहिण्याचा क्रम त्यानें चालू ठेवला व त्याचबरोबर शास्त्रीय जगतांत लागणारे नवनवे शोध, नवे प्रदेश शोधण्यासाठीं लोकांच्या निघणाऱ्या मोहिमा व पूर्वेकडील देशांकडे जाणाऱ्या प्रवाशांचे धाडसी प्रवास वृत्तांत इत्यादि माहिती तो मोठ्या उत्सुकतेनें वाचूं लागला.

१८५४ सालीं त्यानें एक पुस्तक लिहिलें. यांत शास्त्र व धर्म यांचा झगडा फार सुंदर रीतीनें मांडलेला होता. या पुस्तकावरून आपल्या मुलाचा खरा पेशा लेखनव्यवसायच आहे हें त्याच्या बापाला—पिअर व्हर्नेला पटूं लागलें.

१८५७ सालीं 'होनेरिन मोरेल' नांवाच्या एका विधवा स्त्रीबरोबर त्याचा विवाह झाला.

१८६२ सालीं, लेखन-क्षेत्रांत मोठें नांव मिळविण्याची संधि अचानकपणें त्याच्याकडे चालून आली. एम्. 'हेट् झेल' नांवाचा एक प्रकाशक त्याचे सर्व लेख व गोष्टी प्रसिद्ध करण्यास तयार झाला. त्या काळीं हवेंत तरंगणारीं बलून्स नुकतींच प्रचारांत येत होतीं व सर्वसामान्य लोकांना याबद्दल फार जिज्ञासा होती. स्वतः ज्यूल्स् व्हर्ननें बलून्स उडविण्याबद्दल कांहीं प्रयोग केले होते. लगेच 'बलूनमध्यें पांच आठवडे' नांवाचें त्यानें एक पुस्तक लिहिलें व हेट्झेलनें तें प्रसिद्ध केलें. यानंतर एकामागून एक अशा शास्त्रावर आधारलेल्या साहस कथा प्रसिद्ध होऊं लागल्या. लहानपणापासून ज्यूल्स्चें आयुष्य समुद्र-किनाऱ्याजवळ गेलें असल्यामुळें त्याला समुद्राबद्दल एक विलक्षण आकर्षण होतें. १८६५ सालापासून आपल्या बायकोमुलांसह तो समुद्रकिनाऱ्याशीं राहूं लागला. लवकरच 'सेंट मायकेल' नांवाचें समुद्रांतून जाणारें छोटें जहाज त्यानें विकत घेतलें. त्याचीं पुस्तकें खपून त्याला जसजशी भरभराट येऊं लागली तसतशी भारी किंमतीचीं जहाजें तो विकत घेऊं लागला. त्यानंतरचीं त्याचीं बहुतेक सर्व प्रसिद्ध पुस्तकें या जहाजावरच त्यानें लिहिलीं. १८७० सालीं त्यानें लिहिलेलें एक पुस्तक फारच लोकप्रिय झालें. या पुस्तकाचें नांव 'समुद्राच्या खालीं २०,००० लीग' असें आहे. (लीग म्हणजे सुमारें तीन मैल). या कथेंत त्यानें केवळ कल्पनेनें लढविलेली पाणबुडीची कल्पना कांहीं वर्षांनीं विज्ञानाच्या प्रगतीबरोबर प्रत्यक्षांत उतरलेली आपण आज पहातोंच. १८७१ पासून तर त्याच्या लेखनास अधिकच ओज येऊन एकापेक्षां एक वरचढ अशीं सुमारें ५० पुस्तकें त्यानें लिहून काढलीं. 'ऐंशी दिवसांत जगाची चक्कर' हें पुस्तक त्यानें १८७२ सालीं

लिहिलें. हें पुस्तक त्याच्या यशाची चढती कमान म्हणावयास हरकत नाहीं. त्याच्या पुस्तकांतील सर्वांत चमत्कृतिजनक गोष्ट म्हणजे शास्त्राच्या प्रगतावस्थेबरोबर काय काय नवे शोध लागत जातील व त्यामुळें मानवाच्या जीवनावर त्याचा काय काय परिणाम होईल याबद्दलचे त्यानें बांधलेले अंदाज आज अगदीं अचूक ठरलेले आहेत. त्याच्या कल्पनासृष्टींतील हे शोध आज प्रत्यक्षांत लागले असल्यामुळें त्याच्या लेखांना आजहि महत्त्व असून त्याच्या अफाट कल्पनाशक्तीचे व विचारविलासाचें कौतुक वाटून त्याचे लेख व गोष्टी अधिकच उत्कंठेनें वाचाव्याशा वाटतात. उदाहरण द्यावयाचें झाल्यास पुढें लागणाऱ्या शोधांबद्दल आपली कल्पनाशक्ति चालवितांना, बिनतारी संदेशाचा जगभर प्रसार, टेलिव्हिजनचा शोध, टेलिफोन व टेलिव्हिजनचा दुहेरी असा दैनंदिन जीवनांत उपयोग, विज्ञानाच्या सामर्थ्यावर, हवामानावर ताबा, उष्णताशक्तीचें विद्युत्‌शक्तींत रूपांतर इत्यादि त्यानें बांधलेले अंदाज आजच्या विज्ञान युगांत तंतोतंत प्रत्यक्षांत उतरल्याचें पाहून गेल्या शतकांत होऊन गेलेल्या या लेखकाच्या अचूक कल्पनाशक्तीबद्दल अचंबा वाटतो.

१८८६ सालीं, त्याच्या पुतण्यानें वेडाच्या भरांत मारलेली बंदुकीची गोळी पायांत घुसून तो जन्माचा जायबंदी झाला. त्यामुळें जगभर प्रवास करण्याची आपली इच्छा तो पुरी करूं शकला नाहीं. 'अमीन्स' येथें तो कायमचा स्थाइक झाला. त्याचें तेथील घर जगांतील त्याच्या चाहत्यांचें तीर्थक्षेत्र होऊन बसलें आहे.

अपंगपण, एकाकी जीवन, विषण्ण मनःस्थिति अशांत त्याच्या आयुष्याचीं शेवटचीं वर्षें गेलीं. मात्र त्याचें लेखनकार्य तसेंच जोरांत चालूं होतें.

२४ मार्च १९०५ रोजीं तो मरण पावला. त्याच्या मागें त्याची

पत्नी, दोन सावत्र मुली व मायकेल नांवाचा मुलगा येवढा परिवार होता. त्याच्या अंत्यसंस्काराच्या वेळीं पांच हजार लोकांचा जनसमुदाय उपस्थित होता. यांतच आपापल्या राष्ट्रांच्या वतीनें हजर असलेले अनेक देशांचे परराष्ट्रीय वकील होते.

* * *

## पुस्तकाबद्दल थोडेसें—

'८० दिवसांत जगाची चक्कर' हें ज्यूल्स् व्हर्नेच्या अत्यंत गाजलेल्या पुस्तकांपैकीं एक पुस्तक आहे. तें त्यानें १८७२ सालीं लिहिलें.

हल्लीं दळणवळणाच्या साधनांचा वेग व्हर्नेच्या वेळेपेक्षां पुष्कळच वाढला आहे. तरीसुद्धां व्हर्नेची ही कथा पूर्वीच्याच उत्कंठेनें वाचली जाते. केवळ कांहीं संभाषणावरून उद्भवलेली पैज, त्यासाठीं कथेच्या नायकाला व त्याच्या इमानी नोकराला करावा लागणारा सबंध जगाचा प्रवास, प्रवासभर लागलेली वेळेसाठीं शर्यत व त्यांत येणारे अडथळे या सर्व गोष्टींमुळें कथेंत परमावधीची उत्कंठा भरल्यासारखी वाटते. पूर्व दिशेनें प्रवास केल्यास दिवस कमी कमी होत जातो या भौगोलिक सत्याचा कथेंत उत्कंठा वाढविण्यासाठीं लेखकानें केलेला अत्यंत कौशल्य-पूर्ण उपयोग त्याच्या अचाट कल्पनाशक्तीचें द्योतक आहे.

आतां साहजिकच असा प्रश्न उपस्थित होतो कीं, हल्लींच्या सुधारलेल्या वाहनांच्या काळांत अशा तऱ्हेचा प्रवास किती दिवसांत उरकतां येईल? त्याला उत्तर असें कीं, सर्वच्या सर्व प्रवास केवळ विमानानें केल्यास पृथ्वीची प्रदक्षिणा ७ किंवा त्याहून कमी दिवसांत पुरी करितां येईल. मात्र कथेचा नायक फिलिआस फॉग याच्या मार्गानें व त्याच्याचप्रमाणें केवळ आगगाडीनें व आगबोटीनें हा प्रवास केल्यास हल्लींच्या जलद गतीनें जाणाऱ्या वाहनांच्या जोरावर हा प्रवास ८० दिवसांऐवजीं सुमारें ५८ दिवसांत पुरा करितां येईल. व्हर्नेच्या काळाशीं तुलना करितां

आगगाड्यांच्या वेगांत फारशी प्रगति झालेली नाहीं, परंतु आधुनिक यंत्रसामुग्रीच्या जोरावर हल्लींच्या आगबोटी पुष्कळच वेगानें जाऊं शकतात.

व्हर्नेनें हें पुस्तक लिहिलें त्याच्या केवळ चार वर्षें आधीं म्हणजे १८६९ सालीं, सुएझ कालवा खोदण्याचें काम नुकतेंच पूर्ण झालें होतें व पूर्व पश्चिम अमेरिका खंड जोडणारा सान्फ्रान्सिस्को ते न्यूयॉर्क रेल्वेरस्ता अगदीं याच वर्षी पुरा झाला होता. तेव्हां व्हर्नेनें ही कथा लिहिण्याच्या केवळ पांचच वर्षें आधीं अशा प्रवासास ८० दिवसांऐवजीं कित्येक वर्षें लागलीं असतीं !

सुमारें ८६ वर्षांपूर्वीं एका फ्रेंच लेखकानें लिहिलेली ही गोष्ट. त्या वेळीं हिंदुस्थानांत नुकत्याच आगगाड्या सुरू झाल्या होत्या. सबंध जगाचा प्रवासवृत्तांत देतांना हिंदुस्थान देशांतील खंडाळा, ठाणा, कल्याण, मालेगांव, खानदेश, बऱ्हाणपूर, तापी नदी इत्यादि बारीक सारीक गोष्टींचा नामनिर्देश व यथार्थ वर्णन वाचून लेखकाच्या बिनचूक तपशीलाचें व कांटेकोरपणाचें कौतुक वाटतें.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# ऐंशी दिवसांत जगाची चक्कर

## ( १ )

इ. स. १८७२ सालीं लंडन शहरांत ‘ सॅव्हील रो ’ रस्त्यावर ७ नंबरच्या घरांत ‘ फिलिआस फॉग ’ नांवाचा एक मनुष्य रहात होता. हा मनुष्य स्वभावानें तऱ्हेवाईक असून लंडनमधील बड्या लोकांनीं चालविलेल्या ‘ सुधारणावादी क्लब ’चा तो एक सभासद होता. लंडन शहरांत तो चांगला प्रसिद्ध असून सुद्धां या रहस्यमय माणसाच्या व्यक्तिगत जीवनाची लोकांना फारच थोडी अशी माहिति होती.

तो कधींहि बँका अगर स्टॉक एक्सचेंजिसमधून फेरफटका मारतांना कोणी पाहिला नव्हता. तो कोठल्याहि सार्वजनिक ठिकाणीं वावरल्याचें अगर वर्तमानपत्रांत कांहीं कारणावरून त्याचें नांव आल्याचें कोणाच्या ऐकिवांत नव्हतें. कोठल्याहि न्यायालयांत, डायरेक्टर बोर्डांत, पंच मंडळांत किंवा विश्वस्त लोकांत त्याचें नांव कोणीं वाचलें नव्हतें. तो कोणी कारखानदार नव्हता, व्यापारी नव्हता, दुकानदार नव्हता किंवा जमीनदार नव्हता. कोणत्याहि मंडळाचा तो चालक नव्हता, साहित्य-संमेलनाचा अध्यक्ष नव्हता किंवा राजकीय पक्षाचा नेता नव्हता. थोडक्यांत लंडन शहरांत ज्या ज्या थोर सार्वजनिक संस्था व मंडळांचें जें जाळें पसरलें होतें त्यांतील एकाही संस्थेशीं त्याचा संबंध पोंचलेला नव्हता. कांहीं बड्या लोकांनीं स्थापन केलेल्या व केवळ निवडक लोकांसाठींच सभासदत्व राखून ठेवलेल्या ‘ सुधारणावादी क्लबाचा ’ तो एक आजीव सभासद होता. बस्स येवढेंच ! मग अशा खास बड्या

लोकांच्या क्लबाचा सभासद तो होऊं तरी कसा शकला ? त्याला उत्तर एकच ! लंडनमध्यें 'बेअरिंग ब्रदर्स' नांवाची एक मोठी बँक आहे. त्यांत फॉगच्या नांवावर एक भरभक्कम रक्कम जमा होती. या बँकेच्या शिफारशीवरून तो या क्लबाचा सभासद झाला होता.

आतां प्रश्न उपस्थित होतो कीं, फिलिआस फॉग श्रीमंत होता कां ? शंकाच नाहीं. मात्र हा पैसा त्यानें कोठून व कसा मिळविला हें विचाराल तर याचा कोणालाच पत्ता नव्हता आणि ही माहिती खुद्द फॉगला विचारणें यासारखी वेडेपणाची गोष्ट नव्हती. तो स्वतः मोठा उदारांचा राजा होता असें कांहीं नाहीं, परंतु तो लोभी किंवा स्वार्थी नव्हता हें पण तितकेंच खरें. परोपकाराचें किंवा लोककल्याणाचें काम निघाल्यास त्याचा हात नेहमीं पुढें असे. इतकेंच काय अशा वेळीं तो पैसे देई ते सुद्धां पुष्कळदां निनांवी असत.

त्याच्या स्वभावाबद्दल माहिती हवी असेल तर त्याच्यासारखा अबोल एकमार्गी मनुष्य आख्ख्या लंडन शहरांत धुंडून सुद्धां मिळाला नसता. तो फार कमी बोले व त्याच्या या विचित्र मौनांत सुद्धां एक प्रकारचें गूढ भरलेलें असे. त्याच्या आयुष्यक्रमांत गुपीत असें मात्र कांहीं नव्हतें. त्याचा दैनंदिन जीवनक्रम इतका वक्तशीर, नियमित व गणितशास्त्राप्रमाणें काटेकोर असे कीं, गुप्ततेस त्यांत कसला वावच नव्हता.

त्यानें बराच प्रवास केला होता का ? शक्य आहे. कारण जगाच्या कानाकोपऱ्यांतील सुद्धां त्याला अगदीं बारीक सारीक माहिती होती. त्याचे कांहीं अंदाज पुष्कळदां इतके तंतोतंत बरोबर ठरत कीं, क्लबांतील त्याचे स्नेही थक्क होऊन जात.

तो पुरेपूर इंग्लिशमन होता तरी तो मूळचा लंडनचा नव्हे. येवढें मात्र खरें कीं, हल्लीं बरींच वर्षे लंडन शहर सोडून तो अन्यत्र गेला नव्हता.



फिलिअस फॉग

( डेव्हिड निव्हेन )

लंडन येथील त्याचा आयुष्यक्रम घड्याळाच्या कांट्याप्रमाणें अगदीं ठरून गेलेला होता. क्लबांत जाऊन वर्तमानपत्रें वाचणें व पत्त्यांतील त्याचा आवडता 'व्हिस्ट' चा डाव खेळणें हींच त्याच्या करमणुकीचीं मुख्य साधनें होतीं. तो उण्यापुऱ्या उंचीचा, बांधेसूद व आकडेबाज मिशा असलेला धडधाकट असा एक उमदा मनुष्य होता. त्याचें वय चाळीस वर्षें होतें. परंतु त्याला बायको मुलें कोणी नव्हतीं. नातेवाईकहि त्याला कोणी नव्हते. क्लबांतील कांहीं सभासद वगळल्यास त्याला मित्र पण कोणी नव्हते. 'सॅव्हील रो' येथील आपल्या घरांत तो अगदीं एकटा रहात असे. सकाळची न्याहारी व दोन्ही वेळचें जेवण अगदीं ठरलेल्या वेळेवर तो क्लबावरच घेई. रात्रीचा झोपण्यापुरता फक्त तो घरीं येत असे.

'सॅव्हील रो' येथील त्याचें घर सर्व सुखसोयींनीं सज्ज असें होतें. घरांतील कामें करण्यास त्यानें फक्त एक नोकर ठेवला होता. या नोकरास पण आपल्या मालकाप्रमाणें नियमितपणें व कांटेकोरपणें वागावें लागे आणि म्हणूनच त्याच्या घरीं एक नोकर सुद्धां फार काळ टिकणें कठीण होऊन बसलें होतें.

२ ऑक्टोबर रोजीं, या फिलिआस फॉगनें आपल्या नोकरास कामावरून काढून टाकलें. आणि कारण काय तर या नोकरानें फॉगच्या दाढीसाठीं जें पाणी आणलें त्याचें उष्णतामान ८६ अंश फॅरनहिट असावयास पाहिजे होतें त्या ऐवजी तें होतें ८४ अंश फॅरनहिट ! आणि आतां याच वेळीं नोकरीवर रुजूं होणाऱ्या आपल्या नव्या नोकराची तो वाट पहात होता. त्याला त्यानें ११ ते ११॥ वाजतां येऊन भेटण्याची वेळ दिली होती. थोड्या वेळानें त्याच्या जुन्या नोकरानें या नव्या नोकरास त्याच्यापुढें आणून हजर केलें. या नव्या नोकराचें नांव 'जीन पासपोर्टो' असें होतें. तो सुमारें ३० वर्षांचा, बांध्यानें धडधाकट, गुबगुबीत चेहरा असलेला व लहानपणीं भरपूर

व्यायाम केल्यामुळें पीळदार स्नायु असलेला असा एक फ्रेंच मनुष्य होता. तो मूळचा पॅरिसचा असला तरी लंडन येथें अनेक वर्षें नोकरीनिमित्त राहिल्यामुळें त्याला उत्तम इंग्लिश बोलतां येत होतें.

"तुला नोकरीस ठेवण्याची कांहीं व्यक्तींनीं मला शिफारस केली आहे, परंतु माझ्या सर्व अटींची तुला कल्पना आहे ना?" फिलिआस फॉगनें या नव्या नोकरास विचारलें.

"होय साहेब."

"ठीक आहे. तुझ्या घड्याळांत आतां किती वाजले आहेत?"

जीन पासपोर्टीनें साखळी लावलेलें एक भलें मोठें चांदीचें घड्याळ तुमानीच्या खिशांतून बाहेर काढलें व तो म्हणाला, "११ वाजून २२ मिनिटें."

"छे! मग तर तुझें घडयाळ मागें असलें पाहिजे." फिलिआस फॉग म्हणाला.

"महाराज, क्षमा करा, परंतु तें शक्य वाटत नाहीं."

"तूं चार मिनिटें मागें आहेस" फिलिआस फॉग निश्चयानें उत्तरला, "परंतु हरकत नाहीं. तुला तें माहित असलें म्हणजे पुष्कळ झालें आणि आज बुधवार ता. २ ऑक्टोबर १८७२ रोजीं तूं माझ्या नोकरीवर रुजूं होत आहेस."

याच वेळीं घडयाळांत ११॥ चा ठोका पडला. फिलिआस फॉगची क्लबावर जाण्याची ती वेळ होती. लगेच आपल्या जागेवरून तो उठला, खुंटीवरील हॅट डाव्या हातानें उचलून जणूं स्वयंप्रेरित अशा हालचालीनें त्यानें ती आपल्या डोक्यावर ठेवली आणि अधिक एक शब्दहि न बोलतां तो घराच्या बाहेर पडला. उजवा पाय डाव्या पायाच्या ५७५ वेळां पुढें व डावा पाय उजव्या पायाच्या ५७६ वेळां पुढें अशीं

पावलें टाकीत ‘ सुधारणावादी क्लबाच्या ’ टोलेजंग इमारतींत त्यानें प्रवेश केला.

जेवणाच्या प्रशस्त खोलींत जाऊन आपल्या नेहमींच्या टेबलावरील नेहमींची जागा त्यानें घेतली व आपलें नेहमींचें जेवण घेण्यास त्यानें नेहमींच्या वेळीं सुरुवात केली. बरोबर १२ वाजून ४७ मिनिटांनीं जेवण संपवून तो वाचनालयाच्या खोलींत आला. तेथील नोकरानें ‘ दि टाईम्स ’ वर्तमानपत्राचा ताजा अंक त्याच्या हातांत दिला. हें वर्तमानपत्र तो ३–४५ वाजेपर्यंत वाचीत होता. त्यानंतर ‘ दि स्टँडर्ड ’ हें वर्तमानपत्र वाचण्यास त्यानें सुरुवात केली. तें तो सायंकाळीं जेवणापर्यंत वाचीत होता. सायंकाळचें जेवण झाल्यावर लगेच ‘ इव्हिनिंग स्टँडर्ड ’चा अंक त्यानें वाचून काढला. यानंतर अर्ध्या तासानें त्याच्या विशेष परिचयाचे असलेले क्लबांतील ५ सभासद त्याच्याबरोबर गप्पागोष्टी करण्यास जमा झाले. त्यांतील ‘ अँडर्यू स्टुअर्ट ’ हा एक प्रसिद्ध इंजिनिअर होता. ‘ जॉन सुलीव्हन ’ आणि ‘ सॅम्युअल फलांतीन् ’ हे खाजगी बँकांचे डायरेक्टर होते, ‘ थॉमस फ्लॅनेगन ’ हा एका मद्याच्या कारखान्याचा मालक होता व पांचवा सभासद ‘ गोथिअर राल्फ ’ बँक ऑफ इंग्लंड या सरकारी बँकेचा उपाध्यक्ष होता. गप्पा-गोष्टी वगैरे झाल्यावर सर्वांच्या आवडत्या ‘ व्हिस्ट ’चे कांहीं डाव खेळण्याचा त्यांचा परिपाठ होता.

गप्पा चालू असतां मद्याचा कारखानदार श्री. फ्लॅनेगन बँकेचा उपाध्यक्ष, श्री. राल्फला उद्देशून म्हणाला, “ काय हो, परवां जी तुमच्या बँकेमध्यें मोठी चोरी झाली त्याबद्दल कांहीं ताजी बातमी आहे कां ? ” यावर स्टुअर्ट इंजिनिअर म्हणतो, “ मला वाटतें, बँकेचे ते सर्व पैसे गेल्यासारखेच आहेत. ” बँकेचा उपाध्यक्ष श्री. राल्फ यावर आत्मविश्वासानें म्हणाला, “ सर्व बंदरावर आम्ही इतका कडक पहारा

ठेवण्याची व्यवस्था केली आहे कीं, चोराला देश सोडून जाण्याचा आम्ही कसला वावच ठेवलेला नाहीं व लवकरच मुद्देमालासह तो आमच्या अटकेंत सांपडेल."

एव्हांपर्यंत फिलिआस फॉग आपलें डोकें 'इव्हिनिंग स्टँडर्ड'मध्यें खुपसून होता तें बाहेर काढून तो म्हणाला, "या वर्तमानपत्राचें असें मत आहे कीं, ५५००० पौंड येवढी मोठी रक्कम चोरून सुद्धां अद्याप न सांपडणारा चोर कोणी साधासुधा चोर नसून समाजांत पत असलेला तो एखादा धनाढ्य असामी असावा." अशा रीतीनें संभाषणाची दिशा साहजिकच अशा स्वरूपाच्या होणाऱ्या इतर चोऱ्यांच्या दिशेनें वळली व हा चोर देशाबाहेर पळून जाण्यासाठीं काय काय युक्त्या योजील याबद्दल तर्कवितर्क सुरू झाले.

कांहीं सभासदांनीं असें मत प्रदर्शित केलें कीं, या अफाट जगांत पैसा व बुद्धिमत्ता यांच्या जोरावर कायद्याच्या कचाट्यांतून कोणालाही सहज निसटतां येणें शक्य आहे. परन्तु फिलिआस फॉगचें बरोबर उलटपक्षीं मत पडलें. कारण, त्याच्या मतें जग आतां कांहीं इतकें मोठें राहिलें नव्हतें. त्या बँकेच्या डायरेक्टरनें पण फॉगच्या मतास असा दुजोरा दिला कीं, दळणवळणाच्या साधनांच्या प्रगतीमुळें व प्रवासांतील वाढत्या सुखसोयींमुळें हें जग दिवसेंदिवस बरेंच लहान झालें आहे. आणि याच वादाच्या भरांत असा सहज विषय निघाला कीं, सबंध पृथ्वीच्या भोंवतीं प्रदक्षिणा मारावयाची झाल्यास किती वेळ लागेल ?

बहुतेक सभासदांचें असें मत पडलें कीं, हा काल तीन महिने इतका असूं शकेल. मात्र फिलिआस फॉगनें आत्मविश्वासानें असें मत प्रदर्शित केलें कीं, सबंध जगाची चक्कर मारावयाची झाल्यास हा प्रवास ८० दिवसांत सहज पुरा करतां येईल. फॉगचा हा अंदाज त्या पांचही सभासदांना हास्यास्पद वाटला. 'डेली टेलिग्राफ' या वर्तमानपत्रांत

जगाच्या प्रवासाबद्दल एका प्रवाशानें कांहीं अंदाज केला होता तो अंक एका सभासदानें वाचनालयांतून हुडकून आणला. त्यांतील मुख्य कलमें खालीलप्रमाणें होतीं.

| | |
|---|---|
| लंडन ते सुएझ ( मौंट सेनिस व ब्रिंडीसी मार्गें ) रेल्वेनें व आगबोटीनें | ७ दिवस |
| सुएझ ते मुंबई बोटीनें | १३ " |
| मुंबई ते कलकत्ता रेल्वेनें | ३ " |
| कलकत्ता ते हाँगकाँग ( चायना ) बोटीनें | १३ " |
| हाँगकाँग ते योकोहामा ( जपान ) बोटीनें | ६ " |
| योकोहामा ते सान्फ्रान्सिस्को ( अमेरिका ) बोटीनें | २२ " |
| सान्फ्रान्सिस्को ते न्यूयॉर्क रेल्वेनें | ७ " |
| न्यूयॉर्क ते लंडन बोटीनें व रेल्वेनें | ९ " |
| एकूण | ८० दिवस |

तो अंदाज ऐकल्यावर स्टुअर्ट इंजिनिअर म्हणाला, " हा नुसता कागदावर मांडलेला पुस्तकी अंदाज ठीक आहे, परन्तु वाईट हवा, उलटे वादळी वारे, बोटीचा मार्ग चुकणें, आगगाड्यांना होणारे किरकोळ अपघात, जंगलांतून जातांना येणारीं संकटें या सर्व गोष्टींचा या अंदाजांत विचार केला गेला आहे कां ? "

" होय, या सर्व गोष्टी विचारांत घेऊनच ! " फिलिआस फॉग पूर्वींच्याच निश्चयी स्वरानें म्हणाला.

" वर्तमानपत्रांत दिलेला ८० दिवसांचा काल कमींत कमी काल आहे हें तूं विसरतोस फॉग " स्टुअर्ड इंजिनिअरनें हरकत घेतली.

" कमींत कमी वेळेचा योग्य वापर केल्यास ती वेळ सुद्धां पुरी पडूं शकते " फॉगनें लगेच उत्तर दिलें.

" परंतु या हिशेबानें प्रवास करावयाचा झाल्यास आगगाडींतून आगबोटींत व आगबोटींतून आगगाडींत मिनिट् अन् मिनिट वेळेवर उड्याच मारावयास हव्यात ! "

" होय ! तूं म्हणतोस त्याप्रमाणें अगदीं मिनिटन् मिनिट वेळेवर उड्या मारून हा प्रवास वेळेच्या आंत पुरा करणें शक्य आहे " फॉगनें त्याच निर्विकारपणें उत्तर दिलें.

" तर मग, जगाची फेरी ८० दिवसांत पुरी झालेली मला पाहिलीच पाहिजे " स्टुअर्ट इंजिनिअर उपरोधिकपणें म्हणाला.

" चल तर, निघतोस का माझ्याबरोबर अशा प्रवासाला ? " फॉगनें जबाब केला.

" असला नसता उपद्व्याप करण्याची माझी तयारी नाहीं, परंतु या गोष्टीवर चार हजार पौंडांची पैज मारण्याची मात्र माझी तयारी आहे. "

" मग अशा प्रवासाला सांगशील त्यावेळीं निघण्याची पण माझी तयारी आहे. " फॉग त्याच निश्चयानें म्हणाला.

वाद फारच इरेला पोंचल्याचें पाहून सॅम्युअल फलांतीन् मध्यें पडून म्हणाला, " पुरे झाली रे थट्टा ! आतां आपण पत्ते खेळावयास आरंभ करूं. "

परंतु फॉग व स्टुअर्ट इंजिनिअर आपापला हट्ट सोडीनात.

" मी पैज मारतों त्यांत कधींच थट्टा नसते. चार हजार पौंडांची पैज मारण्याची माझी केव्हांही तयारी आहे. "

" मग माझी पण तें आव्हान स्वीकारण्याची तयारी आहे. "

फॉगचा आत्मविश्वास व हेका पाहून अखेर सर्वच सभासदांनीं या पैजेंत भाग घेण्याचें ठरविलें.

फॉगनें पैज जिंकल्यास प्रत्येक सभासदानें फॉगला चार हजार पौंड

द्यावयाचे व फॉग पैज हरल्यास फॉगनें त्या पांचही सभासदांना प्रत्येकीं चार हजार पौंड द्यावयाचे असें ठरलें.

जॉन सलीव्हन फॉगला उद्देशून म्हणाला, "पहा बरं, केवळ कांहीं तासांच्या अगर मिनिटांच्या अनपेक्षित विलंबामुळें सुद्धां तूं २०,००० पौंड गमावून बसशील."

परन्तु फॉगनें लगेच उत्तर दिलें—"अनपेक्षित विलंब ही गोष्टच मी मानावयास तयार नाहीं."

अशा प्रकारें केवळ एका साध्या संभाषणावरून जगाची सफर व त्यावर एका मोठ्या रकमेची पैज मारण्यापर्यंत मजल येऊन पोचली. सफरीच्या वेळचा सर्व खर्च फॉगनें स्वतःच्या पैशांतून न करतां या पांचही सभासदांच्या पैशांतून करावयाचा असा त्यांचा करार झाला. हा करार कागदोपत्रीं मांडला जाऊन सर्वांनीं त्यावर सह्या केल्या.

"बरं ठीक आहे तर!" फॉग म्हणाला, "डोव्हरला जाणारी गाडी लंडनहून ८–४५ वाजतां सुटते त्या गाडीनें मी आज निघेन."

"काय आजच्या आज रात्रीं?" सर्व सभासदांनीं आश्चर्यानें विचारलें. "होय, अगदी आजच्या आज रात्रीं" फॉगनें शांतपणानें उत्तर दिलें. जणूं पलीकडच्या रस्त्यावर जाण्याचें तो बोलत होता. नंतर आपल्या खिशांतील छोटें कॅलेंडर काढून तो म्हणाला, "आज बुधवार तारीख २ ऑक्टोबर, तेव्हां शनिवार तारीख २१ डिसेंबरला ८–४५ वाजतां अगर त्याआधीं जगाची फेरी पुरी करून मी येथें येऊन पोंचलों तर मी पैज जिंकली असें होईल. मात्र या वेळेच्या आंत मी परत येऊं शकलों नाहीं तर माझ्या बँकेच्या खात्यावर लिहिलेली या चेकवरील २०,००० पौंडांची रक्कम तुमच्या मालकीची होईल." असें म्हणून त्यानें तो चेक राल्फ याच्या हवालीं केला.

तोंपर्यंत संध्याकाळचे ७ वाजले होते व पत्ते खेळण्याची त्यांची

नेहमींची वेळ झाली होती. परन्तु आपल्या नियोजित प्रवासाची तयारी करण्यास फॉगला अवधि मिळावा म्हणून पत्ते न खेळतां तसेंच घरीं परतण्याची त्या पांचही सभासदांनीं त्याला परवानगी दिली. परन्तु फॉगनें या सवलतीची कसलीच आवश्यकता नसल्याचें सांगितलें; कारण त्याच्यामतें अशा अनपेक्षित गोष्टीस तो सदाच तयार असे. अशा रीतीनें ७-४५ वाजेपर्यंत नेहमींप्रमाणें तो पत्ते खेळत राहिला.

नंतर सर्व सभासदांचा निरोप घेऊन तो क्लबांतून बाहेर पडला. बरोबर २५ मिनिटांनीं आपल्या नेहमीच्या वेळेवर तो घरीं येऊन पोंचला. त्याचा नवा नोकर पासपोर्टो त्याची वाट पहात होता.

" आपल्याला लंडन स्टेशनवर जाण्यासाठीं दहा मिनिटांत निघावयाचें आहे. कारण सबंध जगाची सफर ८० दिवसांत आपल्याला पुरी करावयाची असून एका क्षणाचाहि विलंब चालावयाचा नाहीं. " त्यानें पासपोर्टोला बजावलें.

निरोप सांगण्याची त्याची तऱ्हा व त्याचा शांत निर्विकार चेहरा पाहून पासपोर्टो विस्मयानें अगदीं थक्क होऊन गेला. त्यानें लगेच प्रवासांत लागणाऱ्या सर्व सामानाची आपल्या मालकास आठवण करून दिली. परंतु फॉगनें या गोष्टींची कसलीच आवश्यकता नसल्याचें सांगून बरोबर घ्यावयाचें सामान म्हणजे रात्रीं लागणारे गरम कपडे, प्रत्येकीं दोन शर्ट व तीन पायमोज्यांचे जोड एवढेच घेण्याची आज्ञा केली. इतर लागणाऱ्या वस्तु वाटेंत विकत घ्यावयाच्या असें सांगितलें. आगगाड्याच्या व आगबोटींच्या वेळा दाखविणारें आंतरराष्ट्रीय वेळापत्रक ( ब्रॅडशॉ ) त्यानें टेबलाच्या खणांतून काढून स्वतःच्या खिशांत कोंबलें.

८ वाजेपर्यंत म्हणजे दहा मिनिटांत पासपोर्टोनें सर्व गोष्टी जमविल्या व घराचीं सर्व दारें, खिडक्या बंद करून आपण तयार असल्याचें मालकास सांगितलें. फॉगनें प्रवासाच्या एका पिशवींत बँक

नोटसूचें एक भलें मोठें पुडकें ठासलें व तो पासपोर्टोला म्हणाला, “ या पिशवीची नीट काळजी घे. कारण त्यांत २०,००० पौंडांच्या नोटा आहेत. ” पासपोर्टोच्या खाकोटीस ती पिशवी, मालकाचा ओव्हरकोट व इतर आवश्यक गोष्टी अशा थाटांत बरोबर ८ वाजतां त्यांनीं तें घर सोडलें. बाहेरचा दरवाजा त्यांनीं एका मोठ्या कुलुपानें बंद केला आणि एक बग्गी ठरवून ते दोघे लंडनच्या ‘ चेरिंग क्रॉस ’ स्टेशनकडे भर वेगांत निघाले. क्लबाचे पांचहि सभासद त्यांना निरोप देण्यास स्टेशनवर आले होते. फॉगनें त्यांना असें आश्वासन दिलें कीं, जगाचा प्रवास केल्याचा पुरावा म्हणून वाटेंत लागणाऱ्या प्रत्येक बंदरावर व महत्त्वाच्या शहरावर तेथील अधिकाऱ्याची आपल्या प्रवास परवान्यावर ( पासपोर्टवर ) तो सही घेईल. बरोबर ८-४५ वाजतां गाडीनें स्टेशन सोडलें आणि जगाच्या फेऱ्याच्या प्रवासास आरंभ झाला.

गाडी स्टेशन सोडून कांहीं मैल गेली नसेल एवढ्यांत कांहीं आठवल्यासारखें वाटून पासपोर्टो स्वतःशींच दचकून कांहींतरी पुटपुटला.

“ काय झाले रे ? ” फॉगनें विचारलें.

“ साहेब, निघण्याच्या घाई गडबडींत माझ्या खोलींतील गॅसची ज्योत बंद करण्यास मी विसरलों. ” पासपोर्टोनें घाबरत घाबरत उत्तर दिलें.

“ कांहीं हरकत नाहीं. ” फॉग बेफिकीरपणें म्हणाला, “ तो गॅस आतां तुझ्या खर्चानें जळत राहूं दे ”.

फिलिआस फॉगच्या या सफरीची हकीगत वर्तमानपत्रापर्यंत पोंचून लवकरच ती सर्वतोमुखीं झाली होती. सबंध जगाची चक्कर ८० दिवसांत पुरी करणें कितपत शक्य आहे याबद्दल अनेक लोकांनीं तर्ककुतर्क केले व वर्तमानपत्रांतून या विषयावर अनेक लेख पण लिहिले गेले. फॉगचा हा प्रयत्न मूर्खपणाचा असून त्यांत त्याला

खात्रीनें अपयश येणार असा शेरा ‘ दि टाइम्स ’, ‘ दि स्टँडर्ड ’, ‘ इव्हिनिंग स्टार ’ व इतर वीस वर्तमानपत्रांनीं मारला. इतकेंच काय अशा अविवेकी साहसाबद्दल त्याच्याशीं पैज मारणाऱ्या क्लबांतील पांचहि सभासदांवर ताशेरा मारण्यास सुद्धां या वर्तमानपत्रांनीं कमी केलें नाहीं. एकट्या ‘ डेली टेलीग्राफ ’ या वर्तमानपत्रानें मात्र फॉगचा हा प्रयत्न खात्रीनें यशस्वी होणार असें मत व्यक्त केलें होतें. याच पत्रांत जगाचा प्रवास ८० दिवसांत करणें शक्य आहे असा अंदाज आलेला होता. इंग्लिश जनतेचें प्रवास व भूगोलशास्त्र यांबद्दलचें प्रेम सर्वश्रुतच आहे. तेव्हां इंग्लंडमधील सर्व लोक या प्रवासाबद्दल वर्तमान-पत्रांतून येणारीं परस्परविरोधी मतें मोठ्या उत्सुकतेनें वाचूं लागले असतील यांत कांहींच नवल नव्हतें.

लंडनच्या अत्यंत नाणावलेल्या ‘ रॉयल जिऑग्राफिकल सोसायटी ’ च्या मासिकांत पण या विषयावर एक मोठा लेख आला होता. या प्रश्नाचा सर्व दृष्टीनें ऊहापोह करून या मासिकानें असा अभिप्राय व्यक्त केला होता कीं, गाड्या व आगबोटी यांच्या निघणाच्या व पोंचण्याच्या वेळा कांहीं दैवी चमत्कारानेंच जर वेळापत्रकाबरहुकूम जमल्या ( जी एक अशक्य गोष्ट होती ) तरच हा प्रवास ठरलेल्या मुदतीच्या आंत पुरा होणें शक्य होतें. या मासिकानें पुढें असाहि प्रश्न केला होता कीं, “आगगाड्यांच्या बाबतींत वेळापत्रकावर अवलंबून रहाणें कांहींसें शक्य आहे, परंतु प्रतिकूल हवामानामुळें आगबोटींना तीन तीन दिवस सुद्धां उशीर होऊं शकतो याचा फॉगनें विचार केला होता का ?”

या सर्व साधकबाधक चर्चेमुळें फॉगच्या या धाडसी प्रवासाबद्दल सबंध लंडन शहरांत एकच खळबळ उडाली. पैजा मारण्याचा षोक असलेल्या लोकांनीं या प्रवासाच्या यशापयशाबद्दल मोठमोठ्या पैजा मारल्या. जुगार खेळणाऱ्या लोकांनीं सुद्धां मोठमोठ्या रकमांचे जुगार

याच प्रश्नावर लावले. फार काय शेअर बाजारांत सुद्धां या पैजेवर लोकांनीं मोठमोठ्या रकमा लावल्या. लंडन स्टॉक एक्सेंजनें तर याहून कमाल केली. या खळवळजनक प्रवासावर पैज मारण्याची संधि सर्व-सामान्य लोकांना सुद्धां मिळावी यासाठीं या एक्स्चेंजनें फिलिआस फॉगच्या नांवावर एक बाँड काढला व लवकरच 'फॉगच्या बाजूनें' व 'फॉगच्या विरुद्ध' अशा शेअर्सवर मोठमोठ्या रकमा लावल्या जाऊन शेअर बाजाराचा व्यवहार नेहमींच्या कियेक पटीनें वाढल्याचें त्यांना दिसून आलें. थोडक्यांत सबंध इंग्लंडच फॉगच्या या प्रवासाबद्दल चर्चा करीत असून त्याच्या या अघटित प्रवासाकडे कान व डोळे लावून बसलें होतें.

( २ )

यानंतर सात दिवसांची गोष्ट. बुधवार ता. ९ ऑक्टोबर रोजीं 'सुएझ' बंदरावर 'मंगोलिया' बोटीची वाट पहात कांहीं लोक उभ होते. यांत दोन व्यक्ति प्रामुख्यानें लक्षांत येत होत्या. त्यांतील एक उंच व लठ्ठ असणारा मनुष्य तेथील ब्रिटीश वकील होता. दुसरा फाटक्या अंगाचा, सूक्ष्म, भेदक दृष्टि असलेला मनुष्य एक खाजगी डिटेक्टिव्ह (गुप्त पोलिस) होता. त्याचें नांव 'फिक्स' असें असून बँकेची चोरी करून फरारी झालेल्या गुन्हेगारास पकडण्यासाठीं निरनिराळ्या बंदरावर जे गुप्त पोलीस नेमण्यांत आले होते त्यांतील तो एक होता. या चोरीबद्दल झालेल्या संभाषणावरूनच फिलिआस फॉगच्या जगाच्या सफरीस सुरुवात झाली होती.

थोड्या अवकाशांत 'मंगोलिया' आगबोट 'सुएझ' ला येऊन पोंचली. तेथें थोडा वेळ थांबून ती मुंबई बंदराकडे जाण्यास निघणार होती. आगबोट बंदराला लागल्यावर उतारू खालीं उतरूं लागतांच फिक्सनें त्यांच्यावर आपली कडक नजर ठेवली. फिलिआस फॉग व त्याचा नोकर याच बोटीनें प्रवास करीत होते. सुएझ येथें पोंचल्याचा

पुरावा असावा म्हणून फॉगनें आपल्या नोकरास आपला पासपोर्ट देऊन खालीं बंदरावर पाठविलें. परंतु कांहीं वेळांतच पासपोर्टो माघारी आला व त्यानें असा निरोप आणला कीं, फॉग स्वतः बंदरावर आल्या-शिवाय तेथील परराष्ट्रीय वकील सही देण्यास तयार नव्हता. तेव्हां फॉगला पण बंदरावर उतरणें भाग पडलें. डिटेक्टिव्ह ' फिक्स ' च्या तीक्ष्ण नजरेंतून ही जोडी चुकली नाहीं व त्यांच्या एकंदर हालचालीं-वरून त्यानें त्यांचाच संशय घेतला. सुएझ येथील ब्रिटिश वकील फॉगला येवढेंच म्हणाला कीं, सुएझ येथें ते मुक्काम करीत नसल्यामुळें प्रवासपरवान्यावर सही घेण्याची कसलीच आवश्यकता नव्हती. फॉगनें लगेच खुलासा केला कीं, सही घेण्याचा उद्देश तो ज्या ज्या ठिकाणीं उतरला त्याचा पुरावा जवळ असावा येवढाच होता. या सर्व संभाषणा-वरून बँकेची चोरी करणारा हाच तो चोर याबद्दलचा ' फिक्स ' चा संशय दुणावला. या चोराला पकडणारास एक मोठें बक्षीस जाहीर झालें होतें व फॉगचा मुंबईपर्यंत पाठलाग करावयाचा असा निश्चय करून ' फिक्स'नें प्रवासाचें तिकिट लगेच खरेदी केलें.

प्रवास सुरू होतांच फिक्सनें कांहीं निमित्त करून पासपोर्टोशीं आपली ओळख करून घेतली व त्याचा मालक फॉग याच्याबद्दल त्याच्यापासून जास्तींत जास्त माहिती काढण्याचा कसून प्रयत्न केला. पासपोर्टो भाबड्या व मोकळ्या मनाचा असल्यामुळें फिक्सला हवी असलेली माहिती मिळण्यास फारसा त्रास पडला नाहीं. मात्र या माहितीच्या आधारावर त्याचा फॉगबद्दलचा संशय दृढतर होत गेला. त्याला असें खात्रीपूर्वक वाटूं लागलें कीं, फॉगनें मारलेली पैज व त्याची जगाची सफर या गोष्टी कपोलकल्पित असून त्यांचा उद्देश आपल्या मागावर असलेल्या गुप्तपोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकणें येवढाच होता. फिक्सला अशी खात्री वाटत होती कीं, लंडनच्या ' स्कॉटलंड यार्ड '



सुएझ येथें झालेल्या विलंबामुळें किंचित चिंतातूर दिसणारे

पासपार्तू व फिलिअस फॉग

( कॅन्टिफ्लास ) ( डेव्हिड निव्हेन )

या पोलिस हेडक्वार्टर्सकडून त्यानें मागितलेलें फॉगच्या अटकेचें वॉरंट त्यांची आगबोट मुंबईला पोंचते आहे तोंपर्यंत त्याच्या हातांत सहज पडेल व अशा रीतीनें फॉगच्या या पृथ्वीप्रदक्षिणेचा तो तेथेंच शेवट करूं शकेल. परंतु फिक्सच्या दृष्टीनें दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, समुद्र शांत असल्यामुळें व वारे पण अनुकूल दिशेनें वहात असल्यामुळें त्या 'मंगोलिया' बोटीचा प्रवास फारच जलद वेगानें पुरा झाला व ती ठरलेल्या वेळेच्या दोन दिवस आधीं म्हणजे २० ऑक्टोबर रोजीं मुंबई बंदरांत येऊन पोंचली. मुंबईला पोंचतांच फॉगला अटक करण्याचा फिक्सचा डाव अशा रीतीनें सपशेल फसला. परंतु या गोष्टींमुळें नाउमेद न होतां या 'बदमाषावर' रात्रंदिवस आपली सक्त नजर ठेवण्याचें त्यानें ठरवून टाकलें.

मुंबईंत उतरल्यावर पुढील प्रवास चालू करण्यास थोडा अवधि होता. त्याचा फायदा घेऊन कांहीं आवश्यक जिन्नस खरेदी करण्यास फॉगनें पासपोर्टोला शहरांत पाठविलें. या फेरफटक्यांत पासपोर्टोनें स्वतःवर व अप्रत्यक्षरीत्या आपल्या धन्यावर एक छोटेसें संकट ओढवलें. तो प्रसंग असा कीं, सांगितलेले जिन्नस विकत घेतल्यावर भटकत भटकत पासपोर्टो एका भव्य अशा हिंदु मंदिराजवळ आला. हिंदु मंदिरांतील रीतिरिवाज माहीत नसल्यामुळें मंदिरांत शिरण्यापूर्वीं पायां-तील बूट काढण्याचें औचित्य न दाखवितां तो तसाच मंदिरांत शिरला. तेथील पुजाऱ्यांच्या लक्षांत ही गोष्ट येतांच ते खवळून त्याच्या अंगा-वर धांवून आले. पासपोर्टोला जीव मुठींत घेऊनच पळावें लागलें. कारण क्षुब्ध झालेला एक मोठा जमाव त्याच्या मागें लागला होता. या जमावानें रागाच्या भरांत त्याच्या पायांतील बूट ओढून काढले. पासपोर्टो तसाच अनवाणी धांपा टाकीत आपल्या मालकापर्यंत येऊन पोचला व त्याला त्यानें सर्व वृत्तांत सांगितला. 'फिक्स' अर्थात् हें सर्व



संभाषण ऐकत होता. त्यानें मनांतल्या मनांत एक बेत योजून कल-कत्त्यापर्यंत त्यांच्याबरोबर तसाच प्रवास चालू ठेवण्याचा निश्चय केला.

## ( ३ )

मुंबई ते कलकत्ता प्रवास त्यांना आगगाडीमधून करावयाचा होता. आगगाडींत त्यांच्या डब्यांत त्यांना एक सहप्रवासी भेटला. त्याचें नांव ' सर फ्रॅन्सिस क्रोमार्टी ' असें होतें. ते सैन्यामध्यें ब्रिगेडिअर जनरल या हुद्यावर होते. बनारसच्या फौजेवरील आपल्या जागेवर रुजूं होण्यासाठीं म्हणून ते निघाले होते. दूर देशांत दोघेहि इंग्लिशमन एकत्र आल्यामुळें फॉग व सर फ्रॅन्सिस क्रोमार्टींची साहजिकच मोठी दोस्ती जमली. बोलतां बोलतां वेळेचा प्रश्न निघाला तेव्हां सर फ्रॅन्सिस यांच्या असें ध्यानांत आलें कीं, पासपोर्टोचें भलें मोठें चांदीचें घड्याळ अजून 'ग्रीनाविच' ( लंडनचें रेखावृत्त ) प्रमाणेंच आपला वेळ दर्शवीत होतें. सर फ्रॅन्सिस

यांनीं पासपोर्टोला त्याची चूक लक्षांत आणून देण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले कीं, पश्चिमेकडून पूर्वदिशेनें प्रवास करीत राहिल्यास दिवस लहान लहान होत जातो. म्हणूनच ते ओलांडून जाणाऱ्या प्रत्येक रेखांशागणिक त्यांचें घड्याळ पाठीमागें करणें आवश्यक होतें. परन्तु पासपोर्टोसारख्या अशिक्षित माणसावर या उपदेशाचा कांहींच परिणाम न होऊन तें घड्याळ आहे त्या स्थितींतच त्यानें चालू ठेवलें.

मुंबई सोडल्यापासून तासाभरांतच कमानी कमानी असलेला एक मोठा पूल ओलांडून त्यांनीं साष्टी बेट मागें टाकलें व ठाण्याच्या जवळपास भूखण्डावरून प्रवास करण्यास सुरुवात केली. कल्याण येथें खंडाळामार्गें पुण्याकडे जाणारा उजवीकडचा फांटा सोडून ईशान्य दिशेनें प्रवास चालू केला. आतां पश्चिमी घाटाच्या दऱ्यांतून त्यांचा प्रवास असून माथ्यावर दाट जंगलें पसरलेल्या उंच उंच डोंगरांच्या रांगांमधून त्यांचा रेल्वे रस्ता जात होता. अधून मधून फॉग व सर फ्रॅन्सिस यांचा संवाद चालत असे. पासपोर्टो मात्र निद्रेच्या केव्हांच आधीन झाला होता. पासपोर्टोसारख्या आनंदी माणसास बेचैन करणारी एकच गोष्ट म्हणजे लंडन येथील त्यांच्या घरांतील गॅसची ज्योत तो न विझवितां आला होता व ती आतां त्याच्या खर्चानें जळणार होती असें फॉगनें त्याला मागेंच बजावलें होतें. बोलतां बोलतां सर 'फ्रॅन्सिस' फॉगला सहज म्हणाले, "केवळ तीनच वर्षांपूर्वीं हा प्रवास तूं जर आरंभला असतास तर याच ठिकाणीं तुझा फार खोळंबा झाला असता, कारण त्या वेळीं रेल्वेचा हा मार्ग पुरा झाला नसून तशा परिस्थितींत या ठिकाणीं उतरून एखाद्या खेचरावरून किंवा डोलींतून सबंध डोंगरच्या डोंगर ओलांडून पुढील प्रवास सुरू करणें तुला आवश्यक झालें असतें." फॉग यावर म्हणाला, "अशा खोळंब्यांचा मी अगोदरच विचार करीत असल्यामुळें त्याच्यांतून मार्ग काढण्याची मीं

आधींच तजवीज केली असती."

रात्रीच्या सुमारास घाट ओलांडून त्यांची गाडी नाशिकला येऊन पोंचली. दुसऱ्या दिवशीं म्हणजे २१ ऑक्टोबरला खानदेश नांवाच्या एका सपाट प्रदेशांतून जोरजोरानें आपला मार्ग आक्रमीत ते चालले होते. हा प्रदेश अत्यंत सुपीक असून आसपासच्या भागांत छोटीं छोटीं खेडीं दिसत होतीं. तापी व इतर नद्या या प्रदेशास पाणी पुरवीत होत्या.

पासपोर्टो जागा होतो आहे तों हिंदुस्थानच्या एका सपाट प्रदेशांतून ग्रेट इंडियन पेनिन्सुलर रेल्वेनें आपण प्रवास करीत असल्याचें त्याच्या लक्षांत आलें. गाडी कापूस, गहूं, बाजरी इत्यादि चित्रविचित्र भासणाऱ्या शेतांच्या बाजूनें भर वेगांत चालली होती. इंजिनमधून निघणाऱ्या वर्तुलाकृति धूम्रवलयांतून बंगले, धर्मशाळा, जुन्या शिल्पकारांनीं घडविलेलीं अनेक पुरातन मंदिरें इत्यादि गोष्टी दिसत होत्या. कितीहि दूरवर पाहिलें तरी सपाट जमीनच जमीन दिसत होती. मधून मधून कांहीं जंगलें लागत होतीं. तीं बहुधा साप, कोल्हे, लांडगे, वाघ, सिंह इत्यादि तऱ्हतऱ्हेच्या प्राण्यांनीं भरलेलीं होतीं. एखादे वेळीं वाघाच्या डरकाळ्यानें त्यांच्या या रूक्ष प्रवासांत थोडा वेळ चेतना येई. रेल्वेलाईनच्या आसपास क्वचित् हत्ती पण दिसत. सकाळच्या प्रहरीं मालेगांव ओलांडून एका निराळ्याच टापूंतून ते जाऊं लागले. त्यांच्या मार्गाच्या केवळ २५-३० मैलांवर एलोरा व औरंगाबाद हीं ठिकाणें होतीं. औरंगाबाद शहर औरंगजेबाची राजधानी होती. परंतु आतां त्याचें उरलेलें महत्त्व म्हणजे निजामाच्या राज्यांतून वेगळें झालेलें शहर येवढेंच होतें. याच भागांत ठगांचा मुख्य जो फिरंगी याचें अधिराज्य होतें. ठगांच्या या टोळीनें येथील भागांत अनेक लोकांचे खून केले होते. ब्रिटिशांनीं या संहारास थोडाफार पायबंद घालण्यांत यश मिळविलें होतें.

दुपारीं १२॥ वाजतां 'बऱ्हाणपूर' येथें त्यांची गाडी येऊन थांबली. येथेंच पासपोर्टोनें त्याचीं पादत्राणें मुंबई येथें गमावलीं गेल्यामुळें वेलबुट्टी असलेला चपलांचा एक जोड खरेदी केला. घाईनें दुपारचें जेवण उरकून त्यांनीं पुढील प्रवास सुरू केला व 'असरघर' येथें येऊन ते पोंचले. येथेंच तापी नदीच्या कांठानें त्यांनीं कांहीं काळ फेरफटका मारला.

२२ ऑक्टोबरला सकाळीं त्यांची आगगाडी 'रोठाल' नांवाच्या जंक्शनच्या सुमारें १५ मैल अलीकडे येऊन थांबली. आतां ते अलाहाबादच्या सुमारें ५० मैलांवर होते. मात्र बराच वेळ झाला तरी त्यांची गाडी जागची हलेना. कांहीं वेळानें रेल्वे कंपनीचा एक नोकर सर्व डब्यांतून हिंडून प्रवाशांना खालीं उतरण्याबद्दल सांगूं लागला. मुंबई ते थेट अलाहाबादपर्यंत गाडीचा लोहमार्ग पुरा झाल्याचें त्यांनीं वर्तमानपत्रांत मागेंच वाचलें होतें. परन्तु आहे त्या परिस्थितींत एका क्षणाचाहि विलंब त्यांना नको होता. तेव्हां उरलेला ५० मैलांचा प्रवास एक हत्ती भाड्यानें घेऊन करावयाचा असा त्यांनीं निश्चय केला.

परन्तु ही गोष्ट अंमलांत आणणें तितकें सोपें काम नव्हतें. ते ज्या 'कोलावी' नांवाच्या खेड्यांत उतरले होते तेथें एकच हत्ती होता, परन्तु तो भाड्यानें देण्यास त्याचा मालक तयार नव्हता. २०० पौंड भाडें देण्याचें कबूल करून देखील तो तयार होईना. अखेर २,००० पौंड येवढी मोठी किंमत देऊन फॉगनें तो हत्ती त्याच्यापासून विकतच घेतला. एका साध्या हत्तीवर येवढ्या मोठ्या रकमेची उधळपट्टी होत असल्याचें पाहून पासपोर्टो आश्चर्यचकित झाला व सर फ्रॅन्सिस यांना पण आपला विस्मय लपविणें कठीण झालें. एका क्षणाचाहि विलंब न लावतां हत्तीवर अंबारी चढवून त्याला प्रवासास तयार करण्यांत आलें. तेथील एका तरुण रहिवाशानें माहुताचें काम करण्याचें कबूल करतांच फॉगनें ताबडतोब त्याची नेमणूक करून टाकली.

अशा रीतीनें एका तासाभरांत त्यांचा पुढचा प्रवास सुरू झाला. विंध्य पर्वतांच्या रांगांतून वळणावळणानें जाणारा खडबडीत रस्ता सोडून माहुतानें कमींत कमी अंतराचा रस्ता निवडला. माहुताला आसपासच्या भागाची पूर्ण माहिती होती व जंगलांतून जाणारा जवळचा मार्ग निवडून प्रवासांतील सुमारें २० मैल अंतर कांटण्याचा त्याचा बेत होता.

लवकरच एका पाम झाडांच्या घनदाट जंगलामधून ते आपला मार्ग आक्रमूं लागले. हत्तीच्या विशिष्ट चालीमुळें अंबारींतील सर्व लोकांस फार धक्के बसत होते. परन्तु ही सर्व गैरसोय त्यांनीं आनंदानें सहन केली.

पासपोर्टो मात्र अंबारींत न बसतां हत्तीच्या मानेच्या भागाजवळ बसला होता. त्यामुळें त्याला तर सर्वांत अधिक गचके बसत होते. हत्तीच्या दर पावलागणिक तो पुढें व मागें अशा रीतीनें फेकला जाई कीं, एखाद्या सर्कशींतील विदुषकाप्रमाणें तो उड्या मारतो आहे असा भास होई. परंतु या कोलांट्या उड्या मारीत असतांना सुद्धां त्याची आनंदी वृत्ति कायम असून अधूनमधून खडीसाखरेचे मोठे खडे तो त्या हत्तीस देऊं करी. तो हत्ती पण इतका हुषार होता कीं, आपल्या चालींत कसलाही फरक पडूं न देतां तो सोंड वर उंचावून ते साखरेचे खडे पासपोर्टोच्या हातांतून घेई.

५ ते ६ तासांचें चालणें झाल्यावर माहुतानें प्रवास थांबवून हत्तीस दोन तास विश्रांति दिली. जवळच्या एका तलावांतील पाणी मनसोक्त पिऊन घेऊन हत्ती जंगलांतील झाडांचीं पानें व झुडपें खाऊं लागला. इकडे पासपोर्टोनें जंगलांतील काटक्या जमवून विस्तव केला व त्यावर खाण्याचे आणलेले जिन्नस तापवून सर्वांनीं भोजन केलें. तें झाल्यावर पुढील प्रवास चालू करण्यास फॉगनें माहुताला आज्ञा केली.

त्यांचा हा प्रवास एका निर्जन अशा खडकाळ मुलुखांतून होता. या प्रदेशांत उंच उंच झाडांची जागा छोट्या छोट्या झुडपांनीं घेतली

होती. या रुक्ष खडकाळ भागांत अंतरा अंतरावर उभ्या असलेल्या पुरातन जीर्ण मंदिरांशिवाय दुसरें कांहीं दिसत नव्हतें. हा भाग बुंदेलखंडांतील उत्तरेकडील भाग असून तो त्या काळीं जवळ जवळ स्वतंत्रच होता. या भागांतून सहसा कोणी प्रवास केला नसेल. येथें कांहीं अतिरिक्त कर्मठ लोकांची वस्ती असून हिंदु धर्मांतील कांहीं रूढ समजुतींना हे धर्मवेडे लोक चिकटून होते. या भागांत अनेक राजे लोकांचीं छोटीं छोटीं राज्यें असून जवळच असलेल्या विंध्य पर्वताच्या आसऱ्याला त्यांनीं आपलें सैन्य ठेवलें होतें. या राजे लोकांची आपापल्या राज्यावर हुकुमत असे. या राजे लोकांना आपल्या कह्यांत आणण्याचें ब्रिटिशांना अजून जमलें नव्हतें.

आतां विंध्याद्री पर्वताची शेवटची रांग ओलांडून ते एका सपाट प्रदेशांतून जात होते. गंगेची एक उपनदी 'कानी' यावर वसलेल्या 'कलिंजर' खेड्याजवळ ते दुपारच्या सुमारास येऊन पोंचले. आतां ईशान्य दिशेस केवळ १२ मैलांवर अलाहाबाद शहर आहे असें कळतांच त्यांनीं थोडा वेळ प्रवास थांबवून विसांवा घेतला.

दुपारीं दोनच्या सुमारास त्यांनीं पुन्हां प्रवासास आरंभ केला. त्यांचा रस्ता या वेळीं एका दाट जंगलामधून जात होता. आतांपर्यंत त्यांच्या प्रवासांत मोठें असें कोणतेंच संकट आलें नव्हतें, तेव्हां याच क्रमानें अलाहाबादपर्यंत आपण सहज पोहोंचूं असा विचार सर्वांच्या मनांत येतो आहे, येवढ्यांत हत्ती किंचित् बेचैन झाल्यासारखा सर्वांना वाटला. जंगलांत इकडे तिकडे बावचळल्यासारखें पाहून व कानोसा घेऊन तो एकाएकीं थांबला व माहुतानें अंकुशानें इषारा दिला तरी तो जागचा हालेना. एव्हांपर्यंत दुपारचे चार वाजले होते. सर फॅन्सिस यांनीं अंबारींतून डोकें बाहेर काढून हत्ती थांबण्याचें कारण काय म्हणून माहुतास विचारलें. परन्तु माहुतालाहि त्याचें कारण उमगलें नव्हतें. आगामी

येणाऱ्या संकटाची जनावरांना कांहीं उपजत बुद्धि असते एवढें मात्र त्याला माहिती होतें. मात्र जंगलांतून कुठून तरी कांहीं अस्पष्ट आवाज ऐकूं येत आहे असा त्याला स्वतःलासुद्धां भास होत होता. थोड्या अवकाशांत त्या अस्पष्ट आवाजाचें एका गलक्यांत रूपांतर होऊन कांहीं लोकांचें तोंडानें गुणगुणणें व त्यांत मिसळणारा वाद्यांचा आवाज असा स्पष्ट ध्वनि सर्वांच्या कानावर येऊं लागला.

माहुतानें लगेच हत्ती कसाबसा चालता करून एका सडकेच्या बाजूला असलेल्या झाडांच्या मागें उभा केला. हें करण्याचा उद्देश सडकेवरून जाणारे येणारे लोक कोणाच्या लक्षांत न येतां त्या सर्वांना सहज दिसूं शकावेत असा होता. थोडया वेळांत वाद्यांचा आवाज अधिक मोठ्यानें ऐकावयास येऊं लागून एक मोठी मिरवणूक त्या सडकेवरून जाऊं लागली. मिरवणुकींतील सर्व लोक कांहीं मंत्र मोठमोठ्यानें म्हणत होते व त्यांना साथ देणाऱ्या एका गंभीर संगीताचा ध्वनि सबंध आसमंतांत भरल्यासारखा वाटत होता. मिरवणुकींतील लोक एका मृत राजाचें शव जंगलांतील एका हिंदु-मंदिराकडे घेऊन चालले होते. जमावांत भिक्षुक, पुजारी, संन्यासी, बैरागी अशा सर्व तऱ्हेचे लोक होते. त्यांत आणखी विस्मय करावयास लावणारी गोष्ट म्हणजे त्यांतील कांहीं भिक्षुक लोक आपल्याबरोबर एका तरुण गोऱ्यापान सुंदर मुलीस तिच्या मनाविरुद्ध दंडानें धरून नेत होते.

"अरे, ही तर सती आहे!" अत्यंत हलक्या आवाजांत सर फ्रॅन्सिस फॉगला म्हणाले. परंतु फॉगला हा सर्व प्रकार इतका नवा व अनपेक्षित होता कीं, त्याचा कांहींच अर्थ न उमगून तो सर फ्रॅन्सिस यांच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागला. "सती म्हणजे स्त्रीची आहुती किंवा बळी. पति मेल्यावर त्याच्या शवाबरोबर तिचें होणारें बलिदान. आणि हें बलिदान पुष्कळदां तिच्या इच्छेविरुद्ध सुद्धां होत

मराठी ग्रं... वि: ........ अनुक्रम नों. दि: ........

असतें." सर फ्रॅन्सिसनीं खुलासा केला. आणि पुढें ते म्हणाले, "ही तरुण स्त्री त्या मृत राजाची विधवा असून उद्यां सकाळीं त्या राजाच्या चितेबरोबरच तिला जिवंत जाळण्यांत येईल."

प्रत्यक्ष पाहिलेला करुणजनक देखावा व त्या तरुण स्त्रीची पुढें होणारी अवस्था याच्या कल्पनेनें फॉगच्या सर्वांगांतून भीतीचा एक कांटा चमकून गेला. या प्रसंगाचा त्याच्या मनावर इतका खोलवर परिणाम झाला होता कीं, तो जमाव दिसेनासा होऊन माहुतानें पुढील प्रवास सुरू केला तरी तो मनांतून कष्टी व चिंतामग्न दिसत होता. अखेर मनांत चाललेला क्षोभ आवरणें अशक्य होऊन तो त्या सर्वांना म्हणाला, "आपल्या कार्यक्रमाच्या आपण अजून बारा तास पुढें आहोंत आणि या तासांचा उपयोग त्या स्त्रीची सोडवणूक करण्यासाठीं आपणास करावयाचा आहे."

ताबडतोब माहुताला त्यानें रस्ता बदलून त्या मंदिराकडे हत्ती घेऊन जाण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें ते निघाले असतां तो माहुत त्या तरुण स्त्रीची हकीकत त्यांना सांगू लागला. ती एका श्रीमंत व्यापाऱ्याची मुलगी असून लहानपणापासून उत्तम शिक्षण मिळाल्यामुळें इंग्लिश भाषा व रीतिरिवाजांशीं तिचा पूर्ण परिचय होता. तिचें नांव 'औधा' असें होतें. तिचें त्या म्हाताऱ्या राजाबरोबर लग्न ठरलें होतें तेव्हां तो बराच आजारी होता. तो मरण पावल्यास आपली काय अवस्था होईल याची तिला पूर्ण कल्पना असल्यामुळें तिनें पळून जाण्याचा एकदां प्रयत्न केला होता परन्तु तो अयशस्वी ठरला होता. ही सर्व हकीगत ऐकून फॉगच्या मनांत तिच्याबद्दल अधिकच अनुकंपा निर्माण झाली व काय वाटेल तो धोका पत्करूनसुद्धां तिची सोडवणूक करावयाची असा त्यानें निर्धार केला. मंदिराच्या जवळपास आल्यावर हत्तीला एका बाजूला बांधून एका झुडुपाच्या आड त्यांनीं आश्रय घेतला. कारण, रात्र पडल्या-

वर त्या स्त्रीची कोणीकडून सोडवणूक करावयाची असा त्यांचा बेत होता. झुडुपाच्या आडून काय प्रकार चालला आहे हें ते पहात होते. त्या मृत राजाच्या शवाभोंवतीं जमलेला भिक्षुकवर्ग कांहीं मंत्र म्हणत होता. जवळच 'औधा' भीतीनें थरथर कांपत खालीं मान घालून उभी होती. सबंध वातावरण एका विषण्ण गलक्यानें भरून गेलें होतें. थोड्या वेळानें मंत्र म्हणण्याचें थांबून जमलेल्या लोकांतील बहुतेक लोक रात्रीची झोंप घेण्यास निघून गेले. कांहीं पहारेकरी कमरेस तलवारी व हातांत जळत्या मशाली घेऊन त्या तरुण स्त्रीवर देखरेख ठेवण्याचें काम करीत होते. या पहाऱ्यांतून तिची कशी काय सुटका करावयाची हा मोठा प्रश्नच होता व मध्यरात्र उलटूं लागली तरी कोणालाच कांहीं उपाय सुचेना. पासपोर्टोनें मात्र स्वतःचाच एक बेत योजून आपल्या सहप्रवाशांशीं त्यांतील एक अक्षरहि न बोलतां त्यांच्यांतून निसटून तो दूर गेला.

अंधाराचे तास हळूं हळूं संपत चालले होते आणि मंदिरांत जबरदस्तीनें शिरून त्या स्त्रीची सोडवणूक करण्याचा त्यांचा पहिला बेत अंमलांत आणणें आतां अशक्य होऊन बसलें होतें. हळूं हळूं काळोखाच्या सांवल्या विरल होत जाऊन अंधाराचें साम्राज्य नष्ट होत चालल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. फॉगच्या पोटांत भयानें भीतीचा गोळा निर्माण झाला. त्या स्त्रीला सती देण्याची वेळ जवळ जवळ येत चालली होती. थोड्या अवकाशांत मंदिराचे दरवाजे उघडले गेले आणि दोन भिक्षुक त्या स्त्रीला घेऊन बाहेर आले. पहांट होतांच संन्यासी, फकीर व इतर शोकमग्न लोकांचा तांडाच्या तांडा पुन्हां मंदिरासमोर जमा झाला. त्या राजाचें शव घेऊन जाणारे लोक, त्यांच्या मागें औधाला धरून नेणारे भिक्षुक व त्यांच्यामागें हा तांडा अशी एक मिरवणूकच मंत्र पुटपुटत चालली होती. फॉग व सर फ्रॅन्सिस

या मिरवणुकीच्या शेवटच्या रांगेंत घुसून त्या गर्दींत मिसळून गेले. थोडें चालून गेल्यावर ही सर्व मिरवणूक एका नदीच्या कांठाशीं आली. तेथें एका चितेवर त्या मृत राजाचें शरीर ठेवण्यांत आलें.



पहांटेच्या धूसर प्रकाशांत आपल्या मृत नवऱ्याच्या शेजारीं दुसऱ्या एका चितेवर त्या तरुण स्त्रीला—'औधा'ला—ठेवलें गेलें. तें सर्व दृश्य पाहून फॉग व सर फ्रॅन्सिस भीतीनें व त्वेषानें थरथर कांपूं लागले. त्या असहाय स्त्रीला सोडवणें आतां तर एक अशक्य गोष्ट होऊन बसली होती. आणि इकडे पासपोर्टोचा पण कोठें पत्ता नव्हता. मंत्रादि विधि झाल्यावर जमावांतील मुख्य साधूनें चितेवरील लांकडें मशालीनें पेटविलीं. तेलांनीं ओलीचिंब झालेल्या लांकडांनीं तेव्हांच पेट घेऊन क्षणांतच एक प्रचंड भडका निर्माण झाला. परंतु एकाएकीं कां कोणास ठाऊक चितेजवळ उभ्या असलेल्या लोकांच्या तोंडून एक भयानक

किंकाळी निघाली व सर्वांनीं आपलीं अंगें जमिनीवर टाकलीं. मेलेला राजा पुन्हां जिवंत झाला असेंच सर्वांना क्षणभर वाटलें. तो ताडकन् त्या चितेवरून उठल्यासारखा वाटला व त्या तरुण स्त्रीला एका हातानें धरून त्या धगधगत्या चितेवरून झप झप पावलें टाकीत तो खालीं उतरला. त्यांच्या भोंवतालीं असलेल्या ज्वाला व धुरानें त्या दोघाहि व्यक्तींना एक तेज:पुंज स्वरूप प्राप्त करून दिलें होतें. तो प्रसंग इतका भयानक व अनपेक्षित होता कीं, भयभीत झालेल्यांपैकीं एकाचीसुद्धां जमिनीवरून माना उंचावून काय प्रकार झाला असावा हें पाहण्याची छाती होईना. आणि ती राजाची आकृति त्या तरुण स्त्रीला–जी आतां कसलाहि प्रतिकार करीत नव्हती–एका हातानें घेऊन सर्व गर्दी ओलांडून फॉग व सर फ्रॅन्सिस उभे होते तिथपर्यंत येऊन पोंचली. "चला, आपल्याला तावडतोब येथून पळ काढला पाहिजे." धुराचे ठसके देत ती आकृति त्यांना म्हणाली, कारण ती व्यक्ति म्हणजे फॉगचा इमानी नोकर पासपोर्टो हाच होता! चितेच्या भोंवतीं तयार झालेल्या दाट धुराचा फायदा घेऊन पासपोर्टोनें मोठ्या चपळाईनें त्या चितेच्या मध्यभागीं शिरून त्या अवलेला उचलून आणून मृत्यूपासून तिची सुटका केली होती!

हत्तीला माहुतानें जोरांत चालावयास लावतांच ते कांहीं मिनिटांतच त्या गर्दीपासून दूर झाले व त्या जंगलांत मिसळून गेले. एक क्षणहि वांया दवडण्यांत अर्थ नव्हता कारण कांहीं थोडें अंतर ते चालून गेले नसतील येवढयांत एक प्रचंड हलकल्लोळ व लोकांचा सैरावैरा पळण्याचा आवाज त्यांच्या कानावर आला. पासपोर्टोनें केलेल्या युक्तीचा त्या जमावाला पत्ता लागला होता हें सहज ताडतां येत होतें. क्षणार्धांत एक बंदुकीची गोळी फॉगच्या हॅटला चाटून गेली. फॉगचें नशीबच बलवत्तर म्हणून तो बांचला. माहुताला

जंगलांतील सर्व पळवाटा माहिती असल्यामुळें त्यानें हत्तीला जास्तींत जास्त चालींत चालवून रात्रीं दहाच्या सुमारास अलाहाबादे-पर्यंत त्या सर्वांना आणून पोंचविलें. लगेच कलकत्त्यास जाण्याचा पुढील प्रवास चालू करण्यासाठीं ते स्टेशनपर्यंत येऊन पोंचले. निरोप घेण्यापूर्वीं फॉगनें माहुताला एक भरभक्कम रक्कम दिली व वर तो हत्ती पण मुशाहिरा म्हणून देऊं केला. प्रथम माहुत तो घेईना. परंतु फॉगला त्या हत्तीचा आतां कांहींच उपयोग नसल्यामुळें फॉगच्या विनंतीस त्या माहुतानें अखेर मान देऊन हत्ती स्वीकारला. आपल्या धन्याचा उदार-पणा पाहून पासपोर्टोला त्याच्याबद्दल अधिकच आदर वाटूं लागला.

( ४ )

अलाहाबाद स्टेशनवर सर्व सुखसोईंनीं युक्त अशा एका खास डब्यांत फॉग, सर फ्रॅन्सिस क्रोमार्टी, 'औंधा' व पासपोर्टो असे सर्व बसले. गाडी बनारसच्या दिशेनें वेगानें चालूं लागली व तेथेंच सर फ्रॅन्सिस यांनीं फॉग व त्यांच्या सोबत्यांचा निरोप घेतला व त्यांच्या इच्छित कार्यास सुयश चिंतिलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सात वाजतां त्यांची गाडी कलकत्ता येथें येऊन पोंचली. लगेच हाँगकाँगकडे जाणारी बोट पकडण्याचा फॉगचा बेत होता, परंतु ती बोट दुपारीं सुटणार असल्यामुळें कलकत्ता शहरांत इकडेतिकडे फेरफटका मारण्यास त्यांना पांच तासांचा कालावधि मिळाला.

परंतु स्टेशन सोडून ते बाहेर पडत आहेत एवढ्यांत एका पोलिसानें त्यांना हटकलें व त्यांच्यांतील फिलिआस फॉग कोण म्हणून तो विचारूं लागला. त्या सर्वांनाच आपल्याबरोबर येण्याची त्यानें विनंति केली. लगेच त्यांनीं एक बग्गी ठरविली व वीस मिनिटांच्या आंत त्यांना प्रांताच्या मॅजिस्ट्रेटपुढें आणून हजर केलें.

त्यांच्या गिरफदारीचें कारण लवकरच स्पष्ट झालें. मुंबईंत असतांना एका हिंदु मंदिरांत पादत्राणें घालून शिरण्याचा पासपोर्टोनें जो उपमर्द केला होता त्याबद्दल त्याला दोषी ठरविण्यांत येऊन त्याच्या मालकाला पण या कृत्याबद्दल जबाबदार धरण्यांत आलें होतें. या गुन्ह्याची खबर कलकत्त्याच्या पोलीस खात्याला तत्परतेनें देऊन फॉगच्या प्रवासांत अडथळा आणण्याच्या युक्तिक्रमाबद्दल डिटेक्टिव्ह 'फिक्स' स्वतःच्या हुषारीवर बेहद्द खूष होता. परंतु फिक्सला विचाऱ्याला काय कल्पना कीं, मॅजिस्ट्रेट मागेल ती रक्कम जामीन म्हणून देण्यास फॉग तेव्हांच तयार होईल? माणशीं १००० पौंड जामीन देण्याची फॉगची ऐपत असेल हें डिटेक्टिव्ह फिक्सच्या तरी कल्पनाशक्तीच्या पलीकडचें होतें. फॉगनें कोर्टानें मागितलेली ही रक्कम मोठ्या आनंदानें दिली, आणि मुंबईहून खास आणवलेले पासपोर्टोचे बूट कोर्टानें त्याला परत केले. त्या बुटांची किंमत आतां जगांतील महागांतील महाग बुटांच्या कित्येक पटीनें अधिक होती.

अशा रीतीनें कायद्याच्या कचाट्यांतून सहीसलामत सुटका होऊन फॉग व त्याचे सहप्रवासी कोर्टाबाहेर आले व एक बग्गी ठरवून बोटीचा धक्का त्यांनीं गांठला. 'फिक्स' एखाद्या सावलीप्रमाणें त्यांची पाठ धरून होताच.

कलकत्ता बंदरांत 'रंगून' नांवाचें मोठें जहाज उभें होतें. आपल्या नसराळ्यांतून वाफेचे भपकारे सोडून व अधून मधून शिट्यांचे आवाज करून आपण लवकरच सुटणार असल्याची तें जाणीव करून देत होतें. त्याच्या डोलकांठीवर 'ब्लू पीटर' बावटा मोठ्या डौलानें फडकत होता. फॉगनें तात्बडतोब एका नावाड्याला बोलाविलें व त्याच्या नावेंतून ते सर्व त्या 'रंगून' जहाजाकडे निघाले. 'फिक्स' त्यांच्या पाठोपाठ बंदरापर्यंत आला होता तो त्यांचा हा उत्साह पाहून

धक्क्यावरच आपले पाय रागारागानें आपटूं लागला. "हलकट लेकाचा!" तो पुटपुटला. २,००० पौंडाची उधळपट्टी करून पुन्हां प्रवास करण्याची याची तयारी आहे! एक चोरच आपल्या पैशावर इतका उदार होऊं शकेल. परंतु हरकत नाहीं. तशी जरूर वाटली तर सबंध जगाचा प्रवास देखील त्याचा पाठलाग करण्यासाठीं मी अवश्य करीन. मात्र अशा बेजबाबदारपणें तो प्रवास करीत राहिल्यास चोरी केलेले पैसेच तोंपर्यंत संपून जातील."

तेव्हां इंग्लंडहून मागविलेलें पकड वॉरंट हातांत पडेपर्यंत त्यांचा पाठलाग करण्याचें आपलें कार्य फिक्सनें तसेंच पुढें चालू ठेवलें व तो पण त्या 'रंगून' जहाजावर उतारू म्हणून सामील झाला. मात्र आपण फॉगचा पाठलाग करीत आहोंत हें त्याच्या लक्षांत येऊं नये म्हणून तो फार खबरदारी घेत होता. बोटीवर एकमेकांची दृष्टादृष्ट झाल्यास केवळ कांहीं विचित्र योगायोगामुळेंच आपण एकत्र प्रवास करीत आहोंत अशी सारवासारव तो करी. पासपोर्टांची कांहीं कारणानें वेगळी गांठ घेऊन 'औधा' ही त्यांच्या प्रवासांत केव्हां व कशी सामील झाली याबद्दलची सर्व माहिती त्यानें त्याच्यापासून काढली. त्याच्या दृष्टीनें ही फार महत्त्वाची गोष्ट होती. कारण त्या आधारावरच फॉग हॉंगकॉंगला उतरणार आहे व औधाच्या नातेवाइकांचा तेथें तपास करणार आहे ही गोष्ट त्याला कळली. हॉंगकॉंग येथें आणखी शक्कल लढवून फॉगला तेथेंच कांहीं काळ अडकवून धरावयाचें व अटकेचें वॉरंट हातांत पडतांच गिरफदार करावयाचें असा त्यानें तेथेंच बेत आंखला.

त्यांच्या या प्रवासांतील शेवटचा दिवस वादळी हवेमुळें फार जिकीरीचा गेला व तें जहाज जें ५ नोव्हेंबरला हॉंगकॉंगला पोंचावयाचें त्या ऐवजी तें ६ नोव्हेंबरला हॉंगकॉंग बंदराला येऊन पोंचलें. फॉगच्या

नियोजित कार्यक्रमाप्रमाणें त्यांचा पुढील प्रवास लगेचच्या लगेच दुसरें जहाज 'कार्नाटक' यामधून चालू होणार होता. परन्तु त्या जहाजाचे बॉयलर्स नादुरुस्त असून ते दुरुस्त झाल्यावर ती आगबोट ५ नोव्हेंबर ऐवजीं ७ नोव्हेंबरला सुटणार असल्याची बातमी त्यांना कळली. अशा रीतीनें केवळ योगायोगानेंच हाँगकाँग येथें सोळा तास घालविण्यास फॉगला मोकळीक होती. या वेळेचा उपयोग 'औधा'चा चुलता—जो एक श्रीमंत व्यापारी होता—याचा कसून शोध करावयाचा असा त्यानें तेव्हांच निश्चय केला. अनेक बँकांमध्यें चवकशी करितां त्याला अशी माहिती कळली कीं, त्या श्रीमंत व्यापाऱ्यानें हाँगकाँग शहर मागेंच सोडलें होतें व युरोपमधील एका शहरांत तो स्थायिक झाला होता. त्यामुळें युरोपपर्यंतचा पुढील प्रवास 'औधा'ला बरोबर घेऊनच करणें त्यांना भाग होतें.

लगेच कार्नाटक जहाजावर तीन खोल्या रिझर्व्ह करण्यासाठीं फॉगनें पासपोर्टोची रवानगी केली. या कामासाठीं पासपोर्टो जात असतां त्याची व डिटेक्टिव्ह फिक्सची गांठ पडली. फॉग व त्याचे सोबती आपला प्रवास दुसऱ्या दिवशीं सुरू करीत आहेत ही बातमी ऐकतांच फिक्सच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली. तो इतका हतबुद्ध झाला कीं, काय वाटेल ते वेडेवाकडे उपाय योजून सुद्धां कोणीकडून त्यांच्या प्रवासांत मोडता घालावयाचा असा त्यानें निश्चय केला. यांत आणखी मोठें संकट म्हणजे त्यांना अशी बातमी कळली कीं, त्या 'कार्नाटक' जहाजाचे बॉयलर्स अपेक्षेपेक्षां लवकर दुरुस्त झाल्यामुळें ती दुसऱ्या दिवशीं सकाळीं न सुटतां आदल्या दिवशीं रात्रीच सुटणार होती. त्यामुळें फिक्सच्या दृष्टीनें परिस्थिति जास्तच आणीबाणीची निर्माण झाली.

फिक्सनें आपला कावा साधण्यासाठीं एक नामी युक्ति योजली. त्या अडाणी पासपोर्टोच्या भोळेपणाचा फायदा घेऊन थापा मारून



औधा

( शर्ली मॅकलीन )

त्याला तो एका अफूच्या गुत्त्यांत घेऊन गेला. नंतर त्यानें त्या फ्रेंच नोकराच्या इमानाची परीक्षा घेण्याचा प्रथम प्रयत्न केला. तो त्याला असें सांगूं लागला कीं, फॉगनें मारलेली पैज व त्याची होणारी जगाची सफर या सर्व केवळ कपोलकल्पित गोष्टी असून बँकेंतून चोरलेले पैसे दूर देशच्या एखाद्या बँकेंत ठेवतां यावेत म्हणून हें सारें नाटक त्यानें रचलें असावें. पासपोर्टोला आपल्या पूर्ण कह्यांत आणण्यासाठीं त्यानें असेंहि आश्वासन दिलें कीं, फॉगला अटक करण्यास पासपोर्टोनें मदत केल्यास, चोर पकडणारास जें मोठें बक्षीस जाहीर झालें होतें, त्यांतील निम्मा भाग त्याला देण्यास तो तयार होता. परन्तु तो इमानी नोकर असल्या कोणत्याच गोष्टींना दाद देईना. अखेर फिक्सनें आपला शेवटचा आसुरी उपाय योजण्याचें ठरविलें. त्यानें अफूनें भरलेला एक पाईप ओढण्यास पासपोर्टोला भाग पाडलें. लवकरच त्या अफूचा अंमल पासपोर्टोवर हळूहळूं होत जाऊन तो गुंगींत कांहीं तरी बडबडूं लागला. थोड्या अवकाशांत तो त्या मादक द्रव्याच्या पूर्ण आहारीं जाऊन हें जग विसरून गेला व तसाच कित्येक तास बेहोष स्थितींत त्या गुत्त्यांत पडून होता.

## (५)

दुसरा दिवस उजाडला परन्तु पासपोर्टोचा तर अजून पत्ता नव्हता. तेव्हां फॉगनें औधासह हाँगकाँग बंदरावर जाण्याचें ठरविलें. मात्र तेथें तो येऊन पोंचतो आहे तों 'कार्नाटक' जहाज आदल्या रात्रीच सुटल्याची भयानक बातमी त्याला ऐकावी लागली. डिटेक्टिव्ह फिक्स पण या ठिकाणीं हजर होता. हाँगकाँगहून दुसरें जहाज आतां आठ दिवसपर्यंत सुटत नव्हतें ही बातमी फॉगला सांगतांना फिक्सला एक आसुरी आनंद होत होता. फॉग हाँगकाँग येथेंच आठ दिवस अडकून

पडला तर त्याला अटक करणें फारच सोपें काम होतें. कारण त्याच्या अटकेचें वॉरंट अगदीं येण्याच्या मार्गावर होतें अशी फिक्सला माहिती होती. परन्तु आलेल्या संकटाला डगमगणारा मनुष्य फॉग नव्हता याची फिक्सला काय कल्पना ? बंदरावर उभ्या असलेल्या लहानमोठ्या जहाजावर जाऊन एखादें जहाज भाड्यानें मिळूं शकेल कां म्हणून फॉग चवकशी करूं लागला. त्याबरोबर फिक्सचें धाबेंच दणाणलें व तो रागानें दांतओठ खाऊं लागला. एखादें जहाज वाटेल ती किंमत देऊन ठरवावयाचें व १४ तारखेपर्यंत योकोहामाला पोंचून तेथून लगेच सान्फ्रान्सिस्कोला निघण्याचा फॉगचा बेत होता.

सुरुवातीला त्यालां कसलेंच यश येईना. वाटेल तें आमिष दाखवून सुद्धां योकोहामा इतक्या लांबच्या प्रवासास आपलें जहाज धोक्यांत घालण्यास एकहि कप्तान तयार होईना. त्याच्या या व्यर्थ तसदीबद्दल अनेकांनीं त्याची चेष्टा पण केली. मात्र या चवकशीचा त्याला एक असा मोठा फायदा झाला कीं, त्याला अशी एक बातमी कळली कीं, शांघाय बंदरांतून एक अमेरिकन बोट योकोहामाला जाण्यास केवळ चारच दिवसांनीं सुटणार होती. फॉगच्या दृष्टीनें ही फारच सोईची गोष्ट होती. कारण हाँगकाँग ते शांघाय हें अंतर ८०० मैल असून चार दिवसांत हा प्रवास सहज पुरा करतां आला असता. या बातमीनें लगेच धीर येऊन 'ब्रिगेन्टाइन' नांवाच्या एका छोट्या जहाजाचा कप्तान 'जॉन बन्स्बी' याला आपणास शांघाय येथें घेऊन जाण्याबद्दल त्यानें त्याचें मन वळविलें. जॉन बन्स्बीनें फॉगला येवढें मात्र बजावलें कीं, समुद्र शांत असेल तरच हा धाडसी प्रयत्न शक्य होता.

फॉगनें त्या कप्तानाला दर दिवसाला ५०० पौंड देण्याचा करार केला व याशिवाय इच्छित ठिकाणीं वेळेवर पोहोंचल्यास १००० पौंड बक्षीस दाखल म्हणून देण्याचें कबूल केलें. अशा तऱ्हेनें तें 'ब्रिगेन्टाइन'

जहाज त्यानें भाड्यानें ठरविलें, व तासाभरांतच आपलें अजस्र शीड फडकावून तें जहाज आपला मार्ग द्रुतगतीनें आक्रमूं लागलें. त्या सरळमार्गी फॉगनें डिटेक्टिव्ह फिक्सलासुद्धां आपल्या जहाजावर येण्याचें आमंत्रण दिलें. कारण त्याला योकोहामाला जाण्याची घाई होती असें त्याच्या बोलण्यावरून दिसलें.

अत्यंत क्षुब्ध अशा समुद्राशीं तोंड द्यावें लागल्यामुळें हा त्यांचा प्रवास फारच साहसमय झाला. उलटा वारा, खवळलेला समुद्र व त्याच्या डोंगरायेवढया लाटांत हेलकावणारें तें छोटें जहाज अशा स्थितींत शांघायला वेळेवर पोंचून ती मेलबोट पकडण्याची त्यांची आशा दुरावत चालली होती. परन्तु गमतीची गोष्ट अशी कीं, आपली सर्व इभ्रत व आयुष्याची कमाई पणाला लागली असतांना सुद्धां फिलिआस फॉग बोटीच्या डेकवर इतक्या शांत व निर्विकारपणें फेऱ्या मारत होता कीं, जणूं तो आपल्या घरापासून त्या सुधारणावादी क्लबाकडे निघाला आहे! खवळलेल्या समुद्राच्या लाटा अंगावर घेऊन त्याचें जहाज मार्ग कापीत चाललें होतें. अखेर शांघाय बंदराच्या कांहीं मैलांवर ते आले असतील येवढयांत दूरवर एक धुराचा लोट त्यांना दिसला व त्यावरून ती अमेरिकन मेलबोट शांघाय बंदरावरून निघाली असावी अशी त्यांची समजूत झाली. ही तर मोठी निराशा होती. 'ब्रिगेन्टाइन'चा कप्तान बन्स्बी मोठ्या हताशपणानें त्या दूरवर दिसणाऱ्या बोटीकडे पहात होता. परन्तु अशा कठीण परिस्थितींत सुद्धां फॉगच्या मनाचा तोल अजिबात सुटला नव्हता. त्यानें कप्तानास चार तोफेचे बार उडविण्यास व बोटीवरील झेंडा अर्धा उतरविण्यास सांगितलें. हें करण्याचा उद्देश त्यांचें जहाज संकटांत सांपडलें आहे असें वाटून ती अमेरिकन बोट त्यांच्या दिशेनें यावी असा होता.

तोफेचा आवाज व अर्धें निशाण या धोक्याच्या इशाऱ्यानें 'जनरल

ग्रँट ’ नांवाची ती अमेरिकन मेलबोट आपला मार्ग बदलून तावडतोब त्यांच्या दिशेनें आली. फॉगनें सर्व खुलासा केल्यावर त्या बोटीच्या कप्तानानें फॉग व त्याच्या सोबत्यांना आपल्या बोटीवर घेतलें. मात्र या नव्या जहाजावर जाण्यापूर्वी फॉगनें ‘ब्रिगेन्टाइन’ बोटीचा कप्तान जॉन बन्स्बीला त्या सर्वांना ‘ शांघाय ’ पर्यंत वेळेवर आणून पोंचविल्याबद्दल कबूल केलेली रक्कम व वरचें बक्षीस पण दिलें.

‘ जनरल ग्रँट ’ बोट आधुनिक यंत्रसामग्रीनें सज्ज असल्यामुळें शांघाय ते योकोहामा हा प्रवास तिनें अत्यंत द्रुतगतीनें केला व १४ नोव्हेंबरला सकाळीं ती योकोहामा बंदरांत येऊन पोंचली. योको-हामाला पोंचल्यावर पहिली गोष्ट जर फॉगनें केली असेल तर त्यानें तेथील बंदरावर ‘ कार्नाटिक ’ बोटीची चवकशी केली. त्याला अशी माहिती मिळाली कीं, ती बोट त्यांच्या कांहीं दिवस अगोदर त्या बंदरांत येऊन पोंचलेली होती. फॉगला व औधाला आनंद वाटेल अशी एक आनंदाची बातमी त्यांना लवकरच कळली आणि ती म्हणजे त्यांचा इमानी नोकर पासपोर्टो या बोटीनें एकटाच प्रवास करीत होता व तो योकोहामा येथेंच उतरला होता. लगेच फॉगनें योकोहामा शहरांत पास-पोर्टोचा जारीनें शोध सुरू केला. अनेक धर्मशाळा, हॉटेल्स, पोस्ट-ऑफिसें इत्यादि ठिकाणीं चवकशी करून सुद्धां त्याचा कोठें पत्ता लागेना. अखेर कंटाळून किंवा कांहीं स्वंयःप्रेरणेनें म्हणाना योको-हामाला एक जंगी सर्कस आली होती. त्या सर्कशीच्या एका प्रयोगाला फॉग औधासह गेला.

आतां पासपोर्टोची काय अवस्था झाली तें आपण पाहूं या. हॉंग-कॉंगहून ७ तारखेला जें ‘ कार्नाटिक ’ जहाज सुटलें त्यांत ज्या २ केबिन्स रिझर्व केलेल्या होत्या त्यांतील एकाच केबिनमध्यें एक उतारू प्रवास करीत होता, आणि तो म्हणजे पासपोर्टो ! हॉंगकॉंग येथील

गुत्त्यांत त्या मादक अफूच्या नशेंत पासपोर्टो कसा सांपडला होता तें आपण मागें वाचलें आहेच. या मादक द्रव्याच्या धुंदींतून तो कांहीं तासांनीं शुद्धीवर आला. आपल्याला गुत्त्यांत घेऊन येणारा फिक्स जवळपास नाहीं असें दिसतांच कांहींतरी दगाफटका असावा असा संशय येऊन तो बोटीच्या धक्क्याशीं पळत पळतच आला. जहाज सुटावयाच्या केवळ कांहीं मिनिटें अगोदर तो डेकवर येऊन पोंचला. फॉग, औधा वगैरे मंडळी बोटीवर नाहींत हें कळल्यावर त्याला फार वाईट वाटलें व डिटेक्टिव्ह फिक्सचा सर्व डाव लक्षांत येऊन त्याच्या-बद्दल त्याच्या मनांत अत्यंत तिरस्कार व संताप उत्पन्न झाला. १३ नोव्हेंबरला तें जहाज योकोहामाला येऊन पोंचलें. बंदरावर पोहोंचे-पर्यंत पासपोर्टोच्या खिशांतील सर्व पैसे संपले होते. तेव्हां कोठेंतरी नोकरी शोधावी म्हणून तो शहरांतून हिंडूं लागला. अखेर एका सर्कशींत लांबनाक्या विदुषकाचें काम त्याला मिळालें. ही सर्कस लवकरच अमेरिकेस जाणार होती व पासपोर्टोनें पण या सर्कशीबरोबर अमेरिकेस जाण्याचें ठरविलें. पासपोर्टोचें शरीर सुदृढ व बळकट असल्यामुळें माणसें एकमेकांवर उभी करून कसरत करण्याच्या सर्कशींतील एका कार्यक्रमांत त्याला आधारस्तंभ म्हणून काम देण्यांत येऊं लागलें. हा कार्यक्रम त्या सर्कशींतील एक महत्त्वाचें आकर्षण होतें. हें अत्यंत जबाबदारीचें काम तो एका खेळाचे प्रसंगीं करीत असतां एकाएकीं देहभान विसरून मोठमोठ्यानें ओरडत तो पळत सुटला. आपल्या अंगावर उभ्या असलेल्या लोकांची काय अवस्था होईल याचा सुद्धां विचार त्याच्या मनांत त्या वेळीं आला नाहीं. तसाच पळत जाऊन प्रेक्षकांत बसलेल्या एका व्यक्तीच्या पायावर लोटांगण घेऊन तो ओरडला-" माझे धनी ! माझे धनी ! " मालकाची व नोकराची त्या ठिकाणीं अशा रीतीनें अत्यंत योगायोगानें गांठ पडली होती ! " कोण

पासपोर्टो कां ” फॉग आश्चर्यानें व आनंदातिशयानें ओरडला. त्यानें त्याला तावडतोब आपल्याबरोबर येण्यास विनंति केली. परन्तु यांत संकट म्हणजे पासपोर्टो व तो सर्कस मॅनेजर यांच्यांत कांहीं मुदतीचा करार झालेला होता. फॉगनें अखेर एक भली मोठी रक्कम भुर्दंड देऊन पासपोर्टोची त्या करारांतून मुक्तता केली.

लगेच त्या अमेरिकन जहाजांतून ‘ सान्फ्रान्सिस्कोकडे ’ जाण्यास ते निघाले. यानंतर नऊ दिवसांनीं जगाला निम्मी प्रदक्षिणा घालण्याइतका त्यांचा प्रवास झालेला होता. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे २३ नोव्हेंबरला त्यांच्या जहाजानें १८० रेखावृत्त ओलांडलें होतें. बरें, त्या डिटेक्टिव्ह फिक्सचें काय झालें ? त्याचा फॉगच्या मागचा ससेमिरा कायम असून तो पण त्या ‘ जनरल ग्रँट ’ जहाजानें त्याच्याबरोबर प्रवास करीत होता. मात्र पासपोर्टोला तोंड दाखविण्याची शरम व भीति वाटत असल्यामुळें तो आपल्या खोलींतच सर्व वेळ बसून होता.

योकोहामाला जहाज पोंचून ते बंदरावर जातात तों फॉगला पकडण्याचें वॉरंट तेथील वकिलातीपर्यंत येऊन पोंचल्याची बातमी फिक्सला कळली. परन्तु एव्हापर्यंत फॉगनें ब्रिटीश मुलुख सोडल्यामुळें त्या वॉरंटचा आतां कांहींच उपयोग नव्हता. तेव्हां जगाची प्रदक्षिणा पुरी करून फॉग इंग्लिश हद्दींत शिरतांच त्याला अटक करावयाची हा मार्ग फिक्सपुढें शिल्लक राहिला. त्यामुळें आतां अशी गंमतीची परिस्थिती निर्माण झाली कीं, इंग्लंडला लवकरांत लवकर जाऊन पोंचण्याची फॉगइतकीच फिक्सला पण उत्सुकता वाटत होती ! आपण एका अट्टल चोराच्या मागावर आहोंत हा त्याचा समज अजून कायम होता. एके दिवशीं कांहीं कामाकरितां बोटीच्या डेकवर तो आला असतां, त्याची व पासपोर्टोची एकाएकीं गांठ पडली. तो दिसतांच पासपोर्टोनें



सानफ्रान्सिस्को येथें

औधा, हॉटेल सेवक, हॉटेल चालिका व फिलिअस फॉग

( जॉर्ज रॅफ्ट ) ( मार्लिन डिट्रिच )

संतापून त्याला भरपूर चोप दिला. फिक्सनें पण मुकाट्यानें तो सहन केला. मात्र आतां यापुढें फॉगच्या मार्गांत कसलेहि अडथळे आणण्याची त्याची इच्छा नसून उलट त्याचा प्रवास लवकर:पुरा व्हावा यासाठीं आपल्या परीनें तो प्रयत्न करणार असल्याचें त्या अडाणी नोकरास त्यानें पटवून दिलें.

३ डिसेंबर रोजीं 'गोल्डन गेट' ओलांडून त्यांची आगबोट अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील 'सान्फ्रान्सिस्को' बंदरावर येऊन पोंचली. डिटेक्टिव्ह फिक्स पण फॉगबरोबरच येथें उतरला व सान्फ्रान्सिस्को शहरांत कोठें अचानक गांठ पडल्यास आपणहि कांहीं अनपेक्षित काम निघाल्यामुळें सान्फ्रान्सिस्कोला उतरलों अशी निरवानिरव त्यानें केली. तेथील काम झाल्यावर आपण लंडनला परतणार असल्याचें सांगून फॉगबरोबर पुढील प्रवास उघड उघडपणें करण्याची मोकळीक पण त्यानें कौशल्यानें मिळवून टाकली. त्यांचा पुढील प्रवास अमेरिका खंडामधून आगगाडीनें होणार होता. हा प्रवास फार धोक्याचा असल्यामुळें फॉगनें पासपोर्टीला कांहीं रिव्हॉल्हर्स विकत आणण्यास पाठविलें. त्या दिवशीं संध्याकाळीं सान्फ्रान्सिस्को स्टेशन सोडून त्यांनीं पुढील प्रवास सुरू केला.

३ दिवस व ३ रात्रींत मिळून ते ३८२ मैल अंतर तोडून गेले. आतां ४ दिवस व ४ रात्री काढल्यावर आपण न्यूयॉर्कला पोंचूं असा त्यांचा अंदाच होता. परन्तु ज्या संकटाची त्यांनीं तयारी केली होती तें संकट त्यांच्यावर येऊन ठेपलेंच. त्यांची गाडी रात्रीच्या वेळीं एका अत्यंत निर्जन भागांतून जात असतां कांहीं रानटी टोळीवाल्यांनीं चालत्या गाडींत चढून इंजिन ड्रायव्हरला जायबंदी केलें व गाडीचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. परन्तु टोळीवाल्यांतील एकासहि इंजिन चालवतां येत नव्हतें. फॉगनें तेवढ्यांत प्रसंगावधान राखून रिव्हॉल्हर


झाडून दोन चार रानटी लोकांना ठार मारलें. परन्तु तेवढ्यावर ते घाबरून न जातां ते आगगाडीवर चालून येतच होते. बिचाऱ्या 'औधा'ची मात्र या अनपेक्षित घटनेमुळें घाबरून बोबडी वळली होती. दरम्यानच्या काळांत पासपोर्तोनें आपल्या स्वभाव-धर्माला अनुसरून स्वतःचा जीव धोक्यांत घातला. चालत्या गाडींच्या डब्यांखालून सरपटत जाऊन इंजिन व मागचे डबे जोडणारी साखळीच त्यानें मोकळी केली. त्यामुळें इंजिन एकटें पुढें गेलें व डब्यांचा वेग क्रमाक्रमानें कमी होत जाऊन ते सर्व डबे 'केआर्नी' नांवाच्या स्टेशनाजवळ येऊन थांबले. या स्टेशनावर मिलिटरीची एक छावणी होती व ही गोष्ट त्या रानटी टोळीवाल्यांस ठाऊक असल्यामुळें ते आगगाडी तशीच सोडून जंगलांत पसार झाले. मात्र जातां जातां त्यांनीं पासपोर्तो व इतर दोन उतारूंना गिरफदार करून नेलें होतें. फॉगला हें कळतांच त्या सर्वांची सुटका झाल्यावांचून पुढील प्रवास करावयाचा नाहीं असा त्यानें निश्चय केला. तेथील कमांडरनें फॉगच्या विनंतीस मान देऊन फौजेची एक तुकडी त्या रानटी लोकांचा पाठलाग करण्यासाठीं पाठवून दिली. आणि आनंदाची गोष्ट म्हणजे त्या तुकडीनें दुसऱ्या दिवशीं सकाळीं पासपोर्तो व इतर दोन प्रवाशांस जिवंतपणें सोडवून आणलें होतें!

आतां त्यांना भेडसावणारा प्रश्न म्हणजे केआर्नी ते न्यूयॉर्क हा प्रवास कसा काय पुरा करावयाचा? त्या आडनिड्या 'केआर्नी' स्टेशनावरून न्यूयॉर्कला जाणारी एकच गाडी होती व ती तर सायंकाळीं सुटत होती. परन्तु पासपोर्तोची सोडवणूक करण्यांत बराच वेळ खर्च झाल्यामुळें एक क्षणहि वायां घालविण्याची फॉगची तयारी नव्हती. फॉगनें आपल्याबरोबर घेतलेलें आंतराष्ट्रीय वेळापत्रक पाहिलें. त्यांत लिव्हरपूलला जाणारी आगबोट ११ डिसेंबरला न्यूयॉर्क बंदरावरून सुटत होती. तेव्हां या वेळेच्या आंत न्यूयॉर्कला पोंचणें आवश्यक होतें.

ते हिवाळ्याचे दिवस होते व जमिनीवर बर्फ पसरलें होतें. वारा पण जोरानें वहात होता. तेव्हां एखाद्या बर्फावरून घसरणाऱ्या शिडाच्या जहाजानें प्रवास करावा असा धाडसी विचार त्याच्या मनांत चमकून गेला. अशाच एका जमिनीवरून घसरणाऱ्या जहाजाच्या मालकाशीं फॉगनें करार केला व केआर्नी ते ओम्हा हा २०० मैलांचा प्रवास त्यांनीं मोठ्या लीलेनें केला. 'ओम्हा' ते शिकागो हा प्रवास सुद्धां उत्तम प्रकारें झाला. ओम्हा ते शिकागो हा प्रवास पुरा करून न्यूयॉर्कला जाणारी आगगाडी त्यांनीं पकडली. हा प्रवास पण त्यांचा कसलाहि खोळंबा न होतां झाला. परन्तु निराशेचें एक मोठें ताट त्यांच्यासाठीं वाढून ठेवलें होतेंच! कारण, न्यूयॉर्क बंदरावर मोठ्या लगबगीनें ते येऊन पोंचतात तों लिव्हरपूलला जाणारी आगबोट पाऊण तासांपूर्वी सुटून गेल्याची भयानक बातमी त्यांना ऐकावी लागली!

आतां एकच मार्ग म्हणजे एखादें जहाज भाड्यानें ठरविणें. परन्तु हें काम सुद्धां सोपें नव्हतें. कारण वाटेल तें भाडें देऊं करून सुद्धां कोठल्याच बोटीचा कप्तान फॉगला लिव्हरपूलपर्यंत थेट सोडण्यास तयार होईना. अखेर फ्रान्समधील 'बोर्डो' नांवाच्या बंदराकडे जाणाऱ्या 'हेन्रीएटा' नांवाच्या जहाजावरील कप्तानाला ८०० पौंड भाडें ठरवुन न्यूयॉर्क ते बोर्डो या प्रवासास त्यांनीं आरंभ केला. फॉगनें मात्र एक वेगळाच बेत मनांत योजला होता. कारण जहाजानें बोर्डोमार्गें प्रवास केल्यास फार मोठा वळसा बसत असून फॉगचा प्रवास निष्कारण लांबणार होता. बरें, कप्तानास मोठें बक्षीस देऊं करून थेट लिव्हरपूलपर्यंत सोडण्यास सांगितलें असतें तर तो तयार झाला नसता याची त्याच्याशीं झालेल्या संभाषणावरून फॉगची खात्री झाली होती. तेव्हां जहाज पूर्ण समुद्रांत शिरलें आहे

असें दिसतांच फॉगनें सर्व खलाशांस लांच देऊन वश करून घेतलें. नंतर जहाजाचा कप्तान 'अॅंड्र्यू स्पीडी' ला कैद करून सबंध जहाजाचा त्यानें आपल्याकडे ताबा घेतला. आतांपर्यंतच्या प्रवासांतील अनुभवामुळें फॉग स्वतः उत्तम दर्यावर्दी बनला होता. लगेच जहाजाचा मार्ग बदलून लिव्हरपूलच्या दिशेनें तें चालविण्यास त्यानें आरंभ केला. अशा रीतीनें सुमारें दीड दिवस त्यांचा प्रवास झाला नसेल



१०५२२

एवढ्यांत एक मोठें विघ्न त्यांच्या मार्गांत उपस्थित झालें! तें असें कीं, लिव्हरपूलच्या ते केवळ ७७० मैल अंतरावर आले असतां जहाजावरील सर्व कोळसा संपला असल्याची भयानक बातमी तेथील खलाशानें फॉगला सांगितली. कोळसा संपण्याचें कारण असें होतें कीं, न्यूयॉर्क ते बोर्डोपर्यंत नेहमीच्या वेगानें जाण्याइतका कोळसा त्या जहाजावर न्यूयॉर्कहून सुटण्यापूर्वीं होता. परन्तु मध्यंतरीच्या काळांत आपला मार्ग बदलून सर्व भट्ट्या पेटत्या ठेवून जहाज फार जलद गतीनें चालविलें गेल्यामुळें त्यावरील कोळसा अपेक्षेबाहेर लवकर संपून गेला. जहाजाच्या चारीहि दिशेला अथांग सागर व त्यांत सर्व कोळसा जळून गेलेला असें एक फारच मोठें संकट सर्वांवर येऊन ठेपलें होतें. परन्तु अशाही परिस्थितींत फॉग डगमगला नाहीं. त्यानें कैदेंत असलेल्या कप्तानाशीं वाटाघाटी करून तें सबंध जहाजच्या जहाज ८,००० पौंडाला त्याच्यापासून विकत घेतलें. ही रक्कम त्या जहाजाच्या मूळ रकमेहून अधिक होती! ताबडतोब जहाजावरील सर्व खलाशांना त्यानें हुकूम सोडला कीं, जहाजावरील लांब लांब डोलकाठ्या, तुळया, खुर्च्या, टेबलें वगैरे सर्व लांकडी सामान मोडून त्या भट्ट्यांतील विस्तव कोणी-कडून पेटता ठेवावयाचा. अशा तऱ्हेनें जहाजावरील लांब वासे, डोलकाठ्या वगैरे मोडून त्यांचे लहान तुकडे करून तें जहाज कोणीकडून चालतें ठेवलें होतें. अशा रीतीनें लिव्हरपूलच्या अलीकडे क्वीन्सटाऊन या बंदरापर्यंत ते जेमतेम येऊन पोंचतात तों जहाजावरील सर्व लांकडी सामान भस्मसात झालें असून तें पूर्वीच्या मानानें सांगाड्याच्या स्वरूपांत दिसत होतें. प्रवास संपतांच फॉगनें कप्तानास तें सांगाडेवजा जहाज बक्षीस दिलें व मित्रत्वाच्या संबंधानें त्याचा निरोप घेतला.

लिव्हरपूल ते डब्लीनपर्यंतचा प्रवास उरकून शेवटचा टप्पा मर्से ते लंडन हा प्रवास करण्यास ८० दिवसांपैकीं आतां फक्त ६ तासच

बाकी होते. हा काळ सुद्धां त्यांना पुरेसा झाला असता. परन्तु लिव्हर-पूलच्या धक्क्यावरून ते बाहेर पडतात तों त्या हिकमती फिक्सनें एक विघ्न उपस्थित केलें. फॉगच्या खांद्यावर हात ठेवून त्याच्या नांवाचें पकडवॉरंट त्याला दाखवून तो म्हणाला, "मी राणीच्या नांवानें तुला अटक करीत आहें!"

लगेच फॉगची रवानगी तुरुंगांतील कोठडींत करण्यांत आली. केवळ सहा तासांसाठीं आपण पैज हरणार हें पाहून तो मनांतून फार चिडला होता. फिक्सवर प्रवासांत केलेल्या उपकाराची त्यानें अशा रीतीनें परतफेड करावी याचें त्याला फार वाईट वाटलें. आतां यांतून मार्ग कसा काढावयाचा याचा फॉग विचार करतो येवढ्यांत डिटेक्टिव्ह फिक्स, पासपोर्टो व औधा त्याच्या कोठडीशीं धांपा टाकीत आले व त्याची ताबडतोब सुटका करून त्यांनीं असा खुलासा केला कीं, खरा चोर आधींच पकडला गेला असून फॉगला पकडण्यांत त्याची फार मोठी चूक झाली होती. फिक्स त्याची क्षमा मागून दिलगिरी व्यक्त करूं लागला. फॉग यावर कांहींच बोलला नाहीं. मात्र आपल्या विशिष्ट स्वयंप्रेरित हालचालीनें त्यानें आपला उजवा हात वर केला व एका ठोशासरशीं त्या डिटेक्टिव्हला जमिनीवर लोळविलें. लगेच औधा व पासपोर्टोसह तो रस्त्यावर आला व एक बग्गी ठरवून आपल्या अभूतपूर्व प्रवासाच्या शेवटच्या पर्वांत त्यानें प्रवेश केला. लगेच लिव्हरपूल स्टेशनवरून त्यानें एक खास गाडी मुक्रर केली व त्यांतून मोठ्या जलद् गतीनें ते लंडनकडे अंतर तोडीत चालले होते. लंडनचें 'चेरिंग क्रॉस' स्टेशन येईतों कोणाच्याच जिवांत जीव नव्हता. मात्र त्यांची गाडी चेरिंग क्रॉस स्टेशनांत येऊन पोंचते आहे तों एक घनघोर निराशा त्यांच्या पदरांत पडली. कारण स्टेशनवरील घड्याळा-कडे त्यांची दृष्टी जाते आहे तों घड्याळांत पावणेनऊ वाजून पांच

मिनिटें झालीं होतीं ! म्हणजे केवळ पांच मिनिटांच्या उशीरानें फिलिआस फॉग पैज हरला होता !

फिलिआस फॉग नुसता पैजंच हरला नव्हता तर ८० दिवसांचा अत्यंत साहसाचा व संकटाचा प्रवास करून वर आपली सर्व इभ्रत, प्रतिष्ठा व आयुष्याची सर्व कमाई गमावून तो देशोधडीला लागला होता. औधा त्याच्या हताश मनाचें सांत्वन करण्याचा आपल्या परीनें प्रयत्न करीत होती. त्या शांत, करारी, उमद्या व संकटांतून तिची सोडवणूक करणाऱ्या ‘ विचित्र ’ माणसावर तिचें प्रेम बसत चाललें होतें. जेव्हां जेव्हां त्याच्या मनाच्या कसोटीची परीक्षा झाली त्या त्या वेळीं त्याच्या कर्तव्यदक्ष व सहृदय मनाची प्रचीति तिला आली होती. आणि तो स्वतःसुद्धां तिच्या प्रेमांत सांपडला होता. मात्र आपणहून त्यानें तें कधींच बोलून दाखविलें नव्हतें. तेव्हां अखेर तें काम ‘औधा’-कडेच आलें. फॉगला आतां गरिबीचे दिवस आले होते व या परिस्थितींत त्याचें सांत्वन व सांभाळ करण्यास औधासारख्या स्त्रीचीच त्याला आतां जरुरी होती. तिला वांचविण्यासाठीं आपल्या प्रवासांतील वेळ जो त्यानें दवडला होता त्यामुळें सुद्धां तो पैज हरला असणें शक्य होता. तिच्याबरोबर त्यानें विवाह केल्यास या घोर निराशेंत त्याला कांहींतरी सुख लाभेल असें तिनें त्याला पटवून दिलें. अखेर ‘ मेरिलेबोन ’ येथील चर्चमध्यें जाऊन तेथील धर्मगुरूबरोबर लग्नाची वेळ दुसऱ्या दिवशीं ठरविण्याबद्दल पासपोर्टोला ताबडतोब रवाना करण्यांत आलें.

## ( ६ )

फिलिआस फॉगच्या ८० दिवसांच्या प्रवासांतील ७७ दिवस उलटून आतां फक्त तीनच दिवस बाकी होते, आणि साऱ्या इंग्लंडचें या अद्भुत सफरीकडे लक्ष वेधून राहिलें होतें. फॉगबद्दल विचारपूस

करणारीं शेंकडों पत्रें रोज वर्तमानपत्रांच्या कचेरींत येऊन पडूं लागलीं. परन्तु फिलिआस फॉगचा कोठेंच पत्ता नव्हता. फॉगच्या सफरीवर शेअर्स घेणारे लोक लंडन येथील स्टॉक एक्स्चेंजमध्यें फॉगबद्दल कांहीं बातमी आली का म्हणून विचारीत. परन्तु तेथील अधिकारी तरी काय उत्तर देणार? त्यांनाहि त्या लोकांइतकीच फॉगबद्दल माहिती होती! या अनिश्चित परिस्थितीमुळें शेअर मार्केटमधील नित्याचा व्यवहार पुष्कळच रोडावला होता. फॉग ८० दिवसांत सफर पुरी करणार म्हणून पैज मारणाऱ्या लोकांच्या तोंडचें तर पाणीच पळालें होतें. कारण फॉग जाऊन इतके दिवस लोटले होते तरी त्याच्याबद्दल कांहींच बातमी कळत नव्हती.

मग सुधारणावादी क्लबांतील सभासदांची काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच करणें कठीण. त्यांना या अनिश्चित परिस्थितीचा अगदीं वीट आला होता. फिलिआस फॉगला जाऊन आज ७७ दिवस लोटले होते व अजून त्याचें कोठून पत्र नव्हतें कीं, त्याचा कोठें ठावाठिकाणा नव्हता. कोठें अपघातांत सांपडून तो मेला तर नव्हता ना? आणि त्याचा नोकर पासपोर्टो? तो कोठें होता? का तो पण आपल्या मालका-बरोबरच ठार झाला होता? फॉगनें हा धाडसी प्रयत्न मध्येंच सोडला तर नव्हता ना? का तो आपला प्रवास योजलेल्या कार्यक्रमाबरहुकुम पुरा करीत असून ठरल्या वेळीं सुधारणावादी क्लबांत हजर होणार होता? फिलिआस फॉग म्हणजे पद्धतशीरपणाचा व वक्तशीरपणाचा मूर्तिमंत पुतळाच होता. तो काय सहजासहजीं आपली पैज थोडीच हरणार होता? ही अनिश्चित परिस्थिति शेवटीं असह्य होऊन क्लबांतील या पांचहि सभासदांनीं देशोदेशीं तारा पाठविल्या, त्याच्या रहात्या घरीं —' सॅव्हील रो ' येथें निरोप पाठविले, पोलिसांत वर्दी दिली, परन्तु फॉगचा कोठेंच पत्ता कळेना.

आज शनिवार ता. २१ डिसेंबर रोजीं सुधारणावादी क्लबाच्या पुस्तकांनीं विभूषित असलेल्या वाचनालयांत फॉगशीं पैज मारणारे पांचहि सभासद येऊन बसले होते. जॉन सलीव्हन व सॅम्युअल फलांतीन हे दोन बँकर्स, अँड्र्यू स्टुअर्ट हा इंजिनिअर, मद्याचा कारखानदार थॉमस फ्लॅनेगन व बँक ऑफ इंग्लंडचा उपाध्यक्ष गॉथिअर राल्फ हे सर्व त्यांत होते.

सुरुवातीला कोणीच कांहीं बोलेना. नंतर मद्याचा कारखानदार थॉमस फ्लॅनेगननें ती स्तब्धता मोडली. तो म्हणाला, "काय हो, लिव्हरपूल बंदरावरून येणारी आगगाडी येथें किती वाजतां येऊन पोंचते?" राल्फला अनेक वेळां प्रवास करावा लागत असल्यामुळें रेल्वेचें टाईमटेबल पाठ होतें. तो म्हणाला, "लिव्हरपूलहून येणारी गाडी ७ वाजून २३ मिनिटांनीं लंडनला येते व त्यानंतर मध्यरात्रीपर्यंत दुसरी गाडी नाहीं."

यावर अँड्र्यू स्टुअर्ट म्हणतो, "मित्रहो, ७–२३ ला येणाऱ्या गाडीनें जर फिलिआस फॉग आला असेल तर तो एव्हांना येथें येऊन पोंचावयास हवा होता. परन्तु तो आला नाहीं त्याअर्थीं तो पैज हरला असें समजावयास हरकत नाहीं."

सॅम्युअल फलांतीन यावर म्हणाला, "परन्तु आपण थोडा दम धरणें हेंच केव्हांही शहाणपणाचें. कारण आपणा सर्वांना माहिती आहेच कीं, आपला हा दोस्त फॉग म्हणजे कांटेकोरपणाचा मूर्तिमंत नमुनाच आहे. एक मिनिट वेळेच्या आधीं नाहीं कीं एक मिनिट वेळेच्या उशीरा नाहीं अशा बेतानें हा अगदीं मिनिटन् मिनिट वेळेवर हजर होईल, कोणी सांगावें?" अँड्र्यू स्टुअर्ट यावर म्हणाला, "फॉग या वेळीं येथें प्रत्यक्ष येऊन हजर झाला तरी माझा विश्वास बसणार नाहीं इतकी मला ती अशक्य गोष्ट वाटते."

थॉमस फ्लॅनेगन म्हणाला, " फिलिआस फॉगचा सगळा बेतच मूर्खपणाचा होता. तो स्वतः कितीहि कांटेकोर व वक्तशीर असो परन्तु मार्गांत येणारे दैवी अगर मानवी अडथळे दूर करणें हें त्याच्या हातचें थोडेंच आहे? आणि या प्रवासांत दिवसांची इतकी थोडी सूट आहे कीं, दोन तीन दिवसांचा जरी काठ खोळंबा झाला तरी त्याचे सर्व बेत फसून तो पैज हरेल."

फॉगचा कट्टर विरोधक ॲंडर्यू स्टुअर्ट यावर धीर येऊन म्हणतो, " आणि ही पण गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे कीं, वाटेंत तारा पाठविण्याच्या इतक्या सोयी असतांनासुद्धां फॉगची एकहि तार येऊं नये यावरून त्याचा बेत मागेंच कोठेंतरी फसला असून आपलें तोंड दाखविण्याची त्याला लाज वाटत असावी."

जॉन सलीव्हन इतका वेळ गप्प होता. कारण नुकत्याच आलेल्या एका वर्तमानपत्राचा ताजा अंक तो वाचीत होता. त्यांतून आपलें डोकें वर काढून तो मोठ्यानें म्हणाला, "मित्रहो! फिलिआस फॉग पैज हरला आहे! अगदीं ९९ हिश्श्यांनीं तो पैज हरला आहे! कारण पहाच ना! न्यूयॉर्कहून आज लिव्हरपूलला पोंचणाऱ्या जहाजांतील उतारूंची यादी या वर्तमानपत्रांत आली आहे आणि यांत फिलिआस फॉग व त्याचा नोकर पासपोर्टो यांचें तर नांव नाहीं. आतां आपल्यापुढें असणारें एकच काम म्हणजे बेअरिंगज् ब्रदर्स बँकेंत जाऊन फॉगचा चेक वटवून २०,००० पौंड आपल्या पांच जणांत वाटून घ्यावयाचे येवढेंच! मित्रहो! थोडेंसें मद्य घेऊन आपण हा प्रसंग साजरा करावयाचा कां?" परन्तु लगेच घड्याळाकडे लक्ष जाऊन किंचित् घाबरून तो म्हणाला, " परन्तु थांबा! घड्याळांत ८–४० झाले असून फॉगला येथें येऊन पोंचण्यांस अजून पांच मिनिटें अवधि आहे." हें त्याचें वाक्य ऐकून फॉगचें येणें आतां अगदीं अशक्य

आहे असें उघड उघड दिसत असल्यामुळें कांहीं सभासद गालांतल्या गालांत हसूं लागले.

साहजिकच आतां सर्वांचें लक्ष घड्याळाकडे लागलें. कारण केवळ पांच मिनिटांच्या अवकाशानें ते पांचहि सभासद प्रत्येकीं चार हजार पौंडांचे धनी होणार होणार होते. त्यांच्या हृदयाचे ठोके जलद गतीनें पडूं लागले. मात्र एकही सभासद आपल्या मनांतील अवस्था बोलून दाखवीत नव्हता.

एव्हांना घड्याळांत ८ वाजून ४२ मिनिटें झालीं होतीं. नेहमीच्या रिवाजाप्रमाणें पत्ते खेळण्यास त्यांनीं सुरुवात केली. परन्तु सगळ्यांचे लक्ष वेळेकडे असल्यामुळें पत्त्यांत त्यांचें लक्ष लागेना. न जाणों फॉग त्यांच्यापुढें हजर होईल कीं काय अशी त्यांना भीति वाटत होती. यावेळीं तरी प्रत्येक मिनिट त्यांना युगाप्रमाणें वाटत होतें.

"चला, ८ वाजून ४३ मिनिटें झालीं" फ्लॅनेगन म्हणाला, व त्यानें पत्त्याचा जोड पिचून दुसऱ्या सभासदास काटावयास दिला. परन्तु इतक्यांत बाहेर कांहीं मोठा आरडाओरडा होत असल्याचा त्यांना भास झाला. वाचनालयांतील भिंतीवर लावलेल्या मोठ्या घड्याळांत मिनिटाचा कांटा व सेकंदाचा कांटा आपापल्या फेऱ्या पुऱ्या करीत होते.

"आणि आतां ८ वाजून ४४ मिनिटें झालीं बरं का!" जॉन सलीव्हन म्हणाला. हें बोलत असतां त्याच्या आवाजांतील कंप सहज लक्षांत येण्यासारखा होता.

आतां एकच मिनिट आणि पैजेचा निकाल लागणार होता. तेव्हां साहजिकच सगळ्यांचें लक्ष केवळ सेकंद काट्याकडेच वळलें. सगळ्यांनीं पत्ते टेबलावर आदळले व ते मोठमोठ्यानें सेकंद मोजूं लागले

४५ सेकंद झाले ! कांहीं नाहीं. ५० सेकंद झाले; तीच शांतता कायम होती. आतां सेकंदाचा कांटा ५५ आंकडा ओलांडणार एवढ्यांत अंतराळांतील वीज धरणीवर कोसळून धरणी दुभंगावी एवढा कांहींतरी प्रचंड आवाज ऐकूं आला. नंतर लोकांच्या आरडाओरड्यानें व गौरव प्रदर्शक आरोळ्यांनीं सारें वातावरण भरून गेलें. भरधांव वेगानें धांवणाऱ्या बग्गीच्या घोड्यांच्या टापांचे आवाज पण त्यांत स्पष्ट ओळखूं येत होते. ५७ व्या सेकंदाला वाचनालयाचें दार उघडलें गेलें आणि सेकंदाचा कांटा ६० च्या आंकड्यावर पोंचला नसेल एवढ्यांत फिलिआस फॉग व त्याच्या मागून आरडाओरडा करणारा एक मोठा जमाव असे वाचनालयाच्या आंत शिरले. आपल्या नेहमींच्या शांत निर्विकार आवाजांत फिलिआस फॉग त्या सर्वांना उद्देशून म्हणाला, " सद्गृहस्थहो ! हा मी वेळेवर येऊन पोंचलों आहें ! "

## ( ७ )


होय ! सुधारणावादी क्लबाच्या वाचनालयांत अशा नाट्यमय रीतीनें प्रवेश करून आल्याची वर्दी देणारा मनुष्य दुसरा तिसरा कोणी नसून फिलिआस फॉगच होता ! एवढेंच नव्हें तर अगदीं मिनिटन् मिनिट वेळेवर पोंचून त्यानें ती मोठी पैज जिंकली होती व वीस हजार पौंडांचा तो धनी झाला होता ! परंतु ही अद्भुत गोष्ट झाली तरी कशी ? त्यासाठीं आधीच्या हकीगतीचा आपण परिचय करून घेतला पाहिजे.

'औधा ' व फॉग यांच्या विवाहाची दुसऱ्या दिवशीं वेळ ठरविण्यासाठीं ' मेरिलेबोन ' चर्चकडे पासपोर्टोला धाडण्यांत आलें होतें. हा भाग मागें आलाच आहे. त्याप्रमाणें तेथें जाऊन तेथील धर्मगुरूबरोबर तो दुसऱ्या दिवशींची वेळ ठरवूं लागला. परंतु तेथील धर्मगुरूंनीं त्याला वेड्यांतच काढलें. ते त्याला म्हणाले कीं, उद्यां

रविवार असल्यामुळें कोठलेंच लग्न त्या दिवशीं लावणें शक्य नव्हतें. पासपोर्टोला याचा बोध न होऊन तो आश्चर्यानें त्यांच्याकडे पाहूं लागला. तो त्यांना येवढेंच म्हणाला कीं, " महाराज, तुमची कांहींतरी चूक होत असावी. कारण आज शनिवार नसून रविवार आहे असें मला वाटतें. " परंतु त्या धर्मगुरूंनीं आज रविवार नसून उद्यां रविवार व आज शनिवार असल्याचें पासपोर्टोला निक्षून सांगितलें व आपला अधिक वेळ न घेण्याबद्दल बजावून त्यास वाटेस लावलें. बिचाऱ्या पासपोर्टोला काय करावें हेंच कळेना. आजचा दिवस खरोखरच शनिवार असेल तर सुधारणावादी क्लबाकडे जाऊन पैज जिंकण्यास अजून अवकाश होता असा विचार त्याच्या मनांत आला व त्यासरशीं लंडन शहरांतून तो भरधांव वेगानें पळूं लागला. रस्त्यांतील लोक या विचित्र माणसाकडे आश्चर्यानें पाहूं लागले. पळण्याच्या श्रमानें प्रचंड श्वासोच्छ्वास व धांपा टाकीतच आपल्या धन्यापर्यंत तो येऊन पोंचला व पाद्र्याचा निरोप त्यानें आपल्या मालकास सांगितला.

" काय म्हणतोस काय? उद्यां रविवार? तर मग आज शनिवार कीं काय? " फॉग भावनावेगानें ओरडला. पासपोर्टोनें आज शनिवार आहे असें परोपरीनें सांगितल्यावरच अखेर त्याचा त्यावर विश्वास बसला. तो पासपोर्टोला म्हणाला, " आज खरोखरच शनिवार असेल तर प्रवासाचे दिवस मोजतांना एका सबंध दिवसाची तूं कोठेंतरी चूक केली असली पाहिजेस. तें आतां कांहींही असो. आपण आपला प्रवास एकंदरींत चोवीस तास लवकर पुरा केला आहे. मात्र क्लबावर वेळेवर जाऊन आपली हजेरी लावण्यांत आतां आपल्याला ८० दिवसांतील फक्त पंधरा मिनिटेंच बाकी आहेत. "

फॉगचे ते शब्द कानांवर पडतांच पासपोर्टोनें आपल्या धन्यास कोटाच्या बाहीनें पकडून घराबाहेर काढलें. आपण कोठें जात आहोंत



हें त्याला कळावयाच्या आंतच एका बग्गींत बसून बग्गी भरधांव वेगानें क्लबाकडे हांकण्यास बग्गीवानाला त्यानें ओरडून सांगितलें. दहा मिनिटांच्या आंत क्लबावर पोंचविल्यास एक मोठें बक्षीस दिलें जाईल असें सांगतांच बग्गीवानानें आपली गाडी इतक्या वेगानें सोडली कीं, सुधारणावादी क्लबापर्यंत ते येऊन पोंचतात तो दोन कुत्रीं गाडीच्या खालीं चेंगरून मेलीं होतीं व पांच गाड्यांशीं टकरा दिल्यामुळें चार माणसें जखमी होऊन हॉस्पिटलांत दाखल झालीं होतीं! मात्र फिलिआस फॉग क्लबाच्या वाचनालयांत येऊन पोंचत आहे तों घड्याळाचा कांटा बरोबर पावणेनऊ वाजल्याचें दर्शवीत होता! २०,००० पौंडांची पैज मिनिटन् मिनिट वेळेवर येऊन त्यानें अखेर जिंकली होती आणि आधीं वर्णन केलेल्या नाट्यमय स्वरूपांत: क्लबाच्या वाचनालयांत मिनिटन् मिनिट वेळेवर तो दाखल झाला होता!

आतां एक असा प्रश्न उद्भवतो कीं, फिलिआस फॉगसारख्या कांटे-कोर माणसाच्या हातून २४ तासांची चूक झाली तरी कशी ? याचें सरळ कारण असें कीं, पूर्व दिशेनें एकसारखा प्रवास करीत राहिल्यास वेळ कमी होत जातो या सत्याकडे त्यानें लक्ष दिलें नाहीं. ही वस्तु-स्थिति सर फ्रॅन्सिस क्रोमार्टीनीं पासपोर्टोच्या लक्षांत आणून देण्याचा मागेंच प्रयत्न केला होता. पूर्व दिशेनेंच जगाचा प्रवास करीत राहि-ल्यास प्रवास काळांतील एक दिवस वाढतो व पश्चिम दिशेनें जगाचा प्रवास करीत राहिल्यास प्रवासकालांतील एक दिवस कमी होतो. फिलि-आस फॉग सर्व प्रवासभर पूर्व दिशेनें प्रवास करीत असल्यामुळें तो ओलांडीत असलेल्या प्रत्येक रेखांश वृत्ताला त्यानें आपलें घड्याळ चार मिनिटांनीं मागें करावयास हवें होतें. अशा रीतीनें सबंध प्रवासांत त्यानें ३६० रेखावृत्तें ओलांडलीं असल्यामुळें ३६० × ४ म्हणजे १४४० मिनिटें म्हणजे २४ तास म्हणजेच त्याच्या प्रवासकालांतील एक सबंध दिवस त्याला न कळतां वाढला होता. दुसऱ्या तऱ्हेनें सांगावयाचें तर पूर्व दिशेनें प्रवास केल्यामुळें, फॉगनें सूर्याला आपल्या डोक्यावर तळ-पतांना ८० वेळां पाहिलें. आणि त्याचे मित्र जे लंडनमध्यें होते त्यांनीं तो ७९ वेळांच पाहिला. आणि याच कारणानें लंडनचा वेळ दाख-विणाऱ्या पासपोर्टोच्या प्रसिद्ध घडयाळानें एक दिवस जास्त दाखविला व शनिवार असतांना रविवारीं आपण पोंचलों व पैज हरलों अशी लंडन स्टेशनवर त्यांची प्रथमतः कल्पना झाली.

फिलिआस फॉगनें अशा रीतीनें पैजेचे २०,००० पौंड जिंकले होते. परन्तु प्रवासकाळांत त्यानें सुमारें १९,००० पौंड खर्च केले असल्यामुळें या पैजेपासून त्याला कसलाही द्रव्यलाभ झालेला नव्हता. आणि बाकी राहिलेले १,००० पौंडसुद्धां आपला इमानी नोकर पास-पोर्टो यासच त्यानें बक्षीस म्हणून देऊं केले. मात्र हें करण्यापूर्वी त्या

कांटेकोर फॉगनें गॅसची ज्योत सतत ८० दिवस जळत ठेवण्याबद्दल जें कंपनीकडून बिल आलें होतें ती रक्कम कापून घेऊनच राहिलेले पैसे पासपोर्टोला दिले. आतां ही पैज जिंकल्याकारणानें फॉगचा व्यक्तिश: काय फायदा झाला असें कोणीं विचारल्यास पैज जिंकल्याचा अपूर्व आनंद व सुखप्राप्ती या दोनच गोष्टी सांगतां येतील.

आतां आपल्या कथेंत सांगण्यासारखी राहिलेली गोष्ट म्हणजे त्या तरुण सुंदर औधाचें लग्न लवकरच मोठ्या थाटांत फिलिआस फॉग-बरोबर झालें. आणि असें भाग्य लाभणार असेल तर कोणीहि पुरुष सबंध जगाची प्रदक्षिणा कमींत कमी दिवसांत पुरी करण्याची मनीषा मनांत बाळगील.

* * *

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ:
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक ........................ नों दि: ..............




आगामी प्रकाशन:-

# — रिप व्हॅन विंकल —

( वीस वर्षे झोपी गेलेल्या माणसाची गोष्ट. )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........ ........
क्रमांक ........ नों दि: ........

विज्ञान प्रकाशन,
६०५।४, नारायण पेठ,
पुणें २.



आगामी प्रकाशन:-

## — सर्कशीची गोष्ट —

( लहान मुलांसाठीं लिहिलेली अत्यंत चटकदार कथा. )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ...... ......
क्रमांक ........................ नों: दि: ...... ...

विज्ञान प्रकाशन,
६०५।४, नारायण पेठ,
पुणें २.

REFBK-0010522
REFBK-0010522